

# शिवराज

१९७९-८०

शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज.



छत्रपती शिवरायांच्या ३०० व्या पुण्यतिथी वर्षानिमित्त

'शिवराज' ची भावपूर्ण आदरांजली !



क. विठ्ठल रामजी शिंदे

संस्थापक – अध्यक्ष



स्वा. बाळासाहेब माने

# संपादकीय....



महाविद्यालयाचं दुसरं सत्र नेहमीच गतीमान् आणि जास्त उत्साही असतं स्नेहसंमेलन धुमधडाक्यानं साजरे झाल्यावर सहाजिकच विद्यार्थ्यांचे डोळे वार्षिक अंकाकडे लागतात. स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांच्या वेगवेगळ्या कलांगुणांचा अविष्कार पहाताना, कलावंत-मित्रांना प्रोत्साहित करताना जसा हा विद्यार्थ्यांचा उत्साह ओसंडून वहात असतो तशीच त्यांची उत्सुकता, वार्षिक अंकात आपली किंवा आपल्या मित्रांची छापील अक्षरे पहाण्यासाठी, डोळ्यांच्या दारांत ओठंगून उभी असते. तेव्हा विद्यार्थ्यांच्या या 'वाट पहाण्या'च्या प्रक्रियेला जराही विलंब न लावता हा ' शि व रा ज ' अंक त्यांच्या हातात योग्य वेळी देता आला याबद्दल आम्हाला आनंद होत आहे.

त्रिविध भाषा-भगिनींच्या या संसारात काय नाही ? भावनेच्या ओलाव्यानं निथळणाऱ्या कविता आहेत, आशयाला सरस अभिव्यक्तीची जोड देणाऱ्या कथा आहेत. थोर नेत्यांच्या कार्याची आदरमिश्रित जाण आहे, ' जे पाहिले ते सांगितले ' असं वर्णनात्मक लेखनही आहे. विद्यार्थी-मित्रांचं हे लेखन-विश्व असं सर्वांगांनी फुललेलं आहे.

हा लेखन–संभार असा एका अंकात बंदिस्त करताना अनेक लोकांच साहाय्य झालं आहे. प्राचार्य देशमुख यांचं 'जाणकाराचं' मार्गदर्शन असल्यामुळं अंक विविध–रंगानी नटला, त्याचबरोबर त्या त्या विभागाचे प्राध्यापक व कर्मचारी यांचं सहकार्यही उल्लेखनीय आहे. प्रा. धुमाळ व त्यांच्या 'झुंझार' छापखान्यातील कर्मचारी यांनी सतत परिश्रम करून अंकाची छपाई सुबक करून दिली. श्री. पोतदार व जोशी यांनीही बहु-मोल सहकार्य केले. प्रा. गवसणे, इतर प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी जाहिरातीकरिता खूपच मेहनत घेतली म्हणून तर या वाढत्या महागाईत अंक निघू शकला, ज्यानी आपुलकीने जाहिराती दिल्या या सर्वांना शिव–राजतर्फे हार्दिक धन्यवाद. शेवटी रसिक विद्यार्थी-मित्रहो, ही तुमचीच शिदोरी तुम्हालाच वाढण्याचे काम मी केले आहे. तेव्हा तिचा स्वाद रस-डोळसपणे घ्याल अशी आशा आहे.

संपादिका

सौ. मधुमालती कोटीभास्कर.

# हृदगत....



" शिवराज महाविद्यालय " म्हणजे महाराष्ट्राच्या दक्षिण दरवाजावरील झळझळती, फडफडती भगवी ध्वजा! सूर्य-कराचा स्पर्श होताच कमळाची एक, एक पाकळी विकसित होते व रंग-गंधाचा सोहळा घडविते, त्याप्रमाणे या महाविद्यालयाचे एक, एक दालन समृद्ध होत आहे. शिवराजने गेल्या कित्येक वर्षांत क्रीडा विश्वात आपला म्हणून एक दबदबा, कोल्हापूर जिल्ह्यात निर्माण केलेला आहे. दिल्ली येथील प्रजासत्ताक दिनाच्या राष्ट्रीय सोहळ्याला सातत्याने एन्. सी. सी. चे विद्यार्थी पाठवून ' शिवराजने ' शौर्यगाथा निर्मिली आहे. 'शिवराज', कला विश्वात आता आपले स्वत्व, अस्तित्व दाखविण्यासाठी पुढे सरसावले आहे. विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विविधांगाने विक-सित करणे, संपन्न करणे, त्याला जीवनातील प्रचंड आव्हाने स्वीकारण्यासाठी समर्थ करणे, त्याचे जीवन नंदादिपासारखे तेजस्वी बनविणे, हे या महाविद्यालयाचे ध्येय आहे. या दृष्टीने अनेक कवी, कथा लेखक महाराष्ट्राला ' शिवराज ' देत आहे. श्री. वि. मा. सुरंगे, श्री. राजन गवस अशी मराठीची ललित लेणी आता येथून निर्माण होत आहेत.

' शिवराज महाविद्यालय ' आता चांगले आकाराला येवू लागले आहे. ' शिवराजची पाच लाख रूपयांची नूतन वास्तू नीलाकाशात उन्नत माथा होवून मोठ्या डौलाने उभी आहे. या महाविद्यालयाला आवश्यक अशा इमारती, आता जवळजवळ

पूर्णावस्थेला आलेल्या आहेत. यावर्षी मुद्दाम उल्लेख करावा अशी 'लाखांची गोष्ट' म्हणजे 'शिवराज,' तीन लाखांचे समृद्ध–ग्रंथालय आपल्या उरी पोटी घेवून, 'अमृताची रससोय' करुन उभे राहिले आहे. एवढे देखणे, शारदेचे संपन्न आदेव लेणे ग्रामिण महाविद्यालयात क्वचीतच कोठे पहावयास मिळेल. विद्यार्थी जीवनाच्या ज्ञानयज्ञातील ही 'घृतधारा' आहे. हिरण्यकेशीच्या कुशीतील हा अमृताचा जिवंत झरा शारदा मंदिराकडे जाणाऱ्या पांथस्थाला आहोरात्र निमंत्रण देत आहे.

'शिवराजचा' विद्यार्थीवर्ग समंजस आहे, सुजनत्वाची त्याला चांगली जान आहे. ज्ञानलालसा त्याच्या रोमरोमी भरलेली आहे. येथे सुटीसाठी 'आटा आटी' नाही. प्राध्यापकांच्या तळ–मळीने ज्ञानाचे सदावर्त येथे आठवड्यातील सर्वच दिवस चालते. यासाठी मिळणारी विद्यार्थ्यांची साथ प्रशंसनीय आहे. अशा या सहयोगामुळे 'शिवराज' ची शैक्षणीक प्रगती उल्लेखनीय आहे.

एन्. एस्. एस्. प्रौढशिक्षण, एन्. सी. सी, वक्तृत्त स्पर्धा, स्नेहसंमेलन, क्रीडा अशा विविध क्षेत्रांतील विद्यार्थ्यांचा सहभाग स्तुत्य आहे. विद्यार्थ्यांचे 'प्रेयस नि श्रेयस' यासाठी या महा–विद्यालयाचा सातत्याने प्रयत्न चाललेला आहे. या संदर्भात

"What greater or better gift can we offer the republic than to teach and instruct our youth ?"

—CICERO

हे वचन मला येथे आवर्जून आठवते. केवळ अर्ध तपाच्या वाट–चालीने झालेल्या ह्या महाविद्यालयाचा कायापालट, क. वि. रा. शिंदे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. खासदार बाळासाहेब माने यांच्या मार्गदर्शनाने, मोठ्या समर्थपणे, झालेला आहे संस्थेचे अन्य पदाधिकारी व सदस्य यांच्या सहकार्याच्या भावनेनेच हे शक्य होवू शकले. प्राध्यापकांच्या सहकार्याने ही वाटचाल सुकर झाली.

गडहिंग्लज, आजरा व चंदगड या तिन्ही तालुक्यातील असंख्य हित चिंतकांनी या महाविद्यालयाच्या उभारणीसाठी व विकासासाठी फार मोलाचे सहकार्य केले आहे. सर्वांच्या प्रेमा–दराचा विषय असलेले हे महाविद्यालय चढत्या, वाढत्या श्रेणीने आपली प्रगती पुढे चालू ठेवील यात शंका नाही.

–प्राचार्य बलवंत देशमुख



# श्रद्धांजली

'शिवाजी विद्यापीठाचे उपकुलगुरु प्रा. भा. शं. भणगे यांचे अकल्पित निधन झाले. ते कुशल प्रशासक, व्यासंगी प्राध्यापक व साहित्यिक व सामाजिक जाण असलेले चतुरस्त्र कार्यकर्ते होते. त्यांच्या निधनाने शैक्षणिक क्षेत्राची फार मोठी हानी झाली आहे. त्याना शिवराजतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.'

—प्राचार्य

# आदरांजली



जन्म आणि मृत्यु ही जीवनाची दोन टोकं ! या दोन्ही टोकांमधील जीवन माणूस कसा जगतो हे महत्वाचं. असंख्य लोकांचं जीवन वैचारिक, आत्मिक दृष्ट्या समृद्ध व्हावं म्हणून जे थोडे लोक आपलं जीवन व्यक्तिगत जीवनाचा बाध ओलांडून, झोकून देतात त्यांचं 'जगणं' हे खरं जगणं. म्हणूनच त्यांच्या मृत्यून सर्व समाजाचीच हानी होते, समाजाचा तोल बिघडतो की काय अशी भीती वाटण्याइतपत ही पोकळी निर्माण होते. पायाखालची वाळू निसटून जाऊन माणूस हतबुद्ध होतो. या प्रकारच्या भावनेचा प्रत्यय कै. लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या मृत्यून सामान्य लोकांना आला.

प्रा. दत्तो वामन पोतदार व प्रा. न. र. फाटक हे दोन महाराष्ट्रातील विद्वत्वर्यांचे मुकुटमणी, स्वातंत्र्य-पूर्व काळात व स्वातंत्र्यानंतर समाजात घडणारी प्रत्येक घटना डोळसपणे पारखून त्या अनुरोधानं समाजाचा वैचारिक पिंड घडविण्यात अग्रेसर राहून समाजाला मार्गदर्शक ठरणारे हे दोन ऋषीतुल्य विचारवंत, इतिहास – संशोधक, वक्ते, ग्रंथकार याच वर्षी आपल्यातून गेले. शेवटपर्यंत कार्यरत राहून शरीर थकल्यावरच ह्यांनी आपल्या हातातील शस्त्रे खाली ठेवली व 'काळा'बरोबर शांतपणे निघून गेले.

शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुंचा अकाली मृत्यु तर अनपेक्षित व धक्कादायकच होता. कुशल प्रशासक, व्यासंगी प्राध्यापक आणि साहित्याची जाण असलेले कुलगुरु फार लवकर गेले लवकर गेले. त्यांच्या हातून अजूनही फार मोठी कामगिरी व्हायची राहूनच गेली.

मराठी काव्य – प्रांतात आपल्या सात्त्विक, सौजन्यशील कवितांनी रसिकांना आकर्षित करून घेणारे कवी सूर्यकांत खांडेकर यांच्या अकल्पित निधनाने महाराष्ट्र –शारदेच्या गळ्यातील मोगरीच्या फुलांची माला जणू सुकून गेली. कविवर्यांची ध्वनि-भावमुद्रीत गीतं, समर गीतं ऐकून त्यातील सुगंधानं न्हाऊन जाणं एवढंच आता आपल्या हाती आहे.

कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे या संस्थेच्या संस्थापकांपैकी एक संस्थापक व कार्यकारिणीचे एक सदस्य मा. कै. दत्ताजीराव कदम यांच्या अकाली निधनाने संस्थेची फार मोठी हानी झाली आहे.

ज्यांच्याबद्दल भविष्यकाळी फार मोठ्या अपेक्षा होत्या, असे मराठीतील एक तरुण कथा लेखक बाळकृष्ण प्रभुदेसाई यांच्या अकाली निधनाने एक जाणतं संवेदनक्षम जीवनच उध्वस्त झाल्याचा प्रत्यय आला.

आणि अगदी अलिकडचा कामेरी जवळचा अपघात ! कै. सौ. शांता जोग व कै. जयराम हर्डीकर यांचा मृत्यू म्हणजे प्रवेश संपायच्या आतच अकस्मात स्टेजवरून नाहीसं होणं कदाचित यमराजालाही प्रश्न पडला असेल की, 'या त चुकीची एन्ट्री घ्यायला कोणी लावलं? अजून पृथ्वीवरचा प्रवेश पुर्ण व्हायला खूप वेळ आहे ?' खरोखरच या कलावंतांना रसिक प्रेक्षकांना हळहळत ठेवून मृत्यूनं झडप घालून पळवून नेलं.

ही काळाच्या पडद्याआड गेलेली माणसं सर्व समाजाची आहेत. त्यांनी समाजाला आपल्या जवळचं सर्व काही भरभरुन दिलं आहे. ज्यांचं ऋण आपण कधीच फेडू शकणार नाही, अशा या थोर लोकांना 'शिवराज' तर्फे नम्र आदरांजली ! !

संपादिका

**सौ. मधुमालती कोटीभास्कर**



जन्म आणि मृत्यु ही जीवनाची दोन टोकं ! या दोन्ही टोकांमधील 'जीवन' माणूस कसा जगतो हे महत्वाचं. असंख्य लोकांचं जीवन वैचारिक, आत्मिक दृष्टया समृद्ध व्हावं म्हणून जे थोडे लोक आपलं जीवन व्यक्तिगत जीवनाचा बांध ओलांडून, झोकून देतात त्याचं 'जगणं' हे खरं जगणं. म्हणूनच त्यांच्या मृत्यूनं सर्व समाजाचीच हानी होते, समाजाचा तोल बिघडतो की काय अशी भीती वाटण्याइतपत ही पोकळी निर्माण होते, पायाखालची वाळू निसटून जाऊन माणूस हतबुद्ध होतो. या प्रकारच्या भावनेचा प्रत्यय कै. लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या मृत्युनं सामान्य लोकांना आला.

प्रा. दत्तो वामन पोतदार व प्रा. न. र. फाटक हे दोन महाराष्ट्रातील विद्वत्वर्यांचे मुकुटमणी, स्वातंत्र्य-पूर्व काळात व स्वातंत्र्यानंतर समाजात घडणारी प्रत्येक घटना डोळसपणे पारखून त्या अनुरोधानं समा-जाचा वैचारिक पिंड घडविण्यात अग्रेसर राहून समा-जाला मार्गदर्शक ठरणारे हे दोन ऋषीतुल्य विचारवंत, इतिहास – संशोधक, वक्ते, ग्रंथकार याच वर्षी आपल्यातून गेले. शेवटपर्यंत कार्यरत राहून शरीर थकल्यावरच ह्यांनी आपल्या हातातील शस्त्रे खाली ठेवली व 'काळा'बरोबर शांतपणे निघून गेले.

शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुंचा अकाली मृत्यु तर अनपेक्षित व धक्कादायकच होता. कुशल प्रशासक, व्यासंगी प्राध्यापक आणि साहित्याची जाण असलेले कुलगुरु फार लवकर गेले. लवकर गेले. त्यांच्या हातून अजूनही फार मोठी कामगिरी व्हायची राहूनच गेली.

# आदरांजली

मराठी काव्य – प्रांतात आपल्या सात्विक, सौजन्यशील कवितांनी रसिकांना आकर्षित करून घेणारे कवी सूर्यकांत खांडेकर यांच्या अकल्पित निध-नाने महाराष्ट्र –शारदेच्या गळ्यातील मोगरीच्या फुलांची माला जणू सुकून गेली. कविवर्यांची ध्वनि-भावमुद्रीत गीतं, समर गीतं ऐकून त्यातील सुगंधानं न्हाऊन जाणं एवढंच आता आपल्या हाती आहे.

कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे या संस्थेच्या संस्थापकांपैकी एक संस्थापक व कार्यकारिणीचे एक सदस्य मा. कै. दत्ताजीराव कदम यांच्या अकाली निधनाने संस्थेची फार मोठी हानी झाली आहे.

ज्यांच्याबद्दल भविष्यकाळी फार मोठ्या अपेक्षा होत्या, असे मराठीतील एक तरुण कथा लेखक बाळकृष्ण प्रभुदेसाई यांच्या अकाली निधनाने एक जाणतं संवदेनक्षम जीवनच उध्वस्त झाल्याचा प्रत्यय आला.

आणि अगदी अलिकडचा कामेरी जवळचा अपघात ! कै. सौ. शांता जोग व कै. जयराम हर्डीकर यांचा मृत्यू म्हणजे प्रवेश संपायच्या आतच अकस्मात स्टेजवरून नाहीसं होणं कदाचित यमराजालाही प्रश्न पडला असेल की, 'यांना चुकीची एन्ट्री घ्यायला कोणी लावलं? अजून पृथ्वीवरचा प्रवेश पूर्ण व्हायला खूप वेळ आहे ?' खरोखरच या कलावंतांना रसिक प्रेक्षकांना हळहळत ठेवून मृत्यूनं झडप घालून पळवून नेलं.

ही काळाच्या पडद्याआड गेलेली माणसं सर्व समाजाची आहेत. त्यांनी समाजाला आपल्या जवळचं सर्व काही भरभरुन दिलं आहे. ज्यांचं ऋण आपण कधीच फेडू शकणार नाही, अशा या थोर लोकांना 'शिवराज' तर्फे नम्र आदरांजली ! !

संपादिका
**सौ. मधुमालती कोटीभास्कर**

# मराठी विभाग



" जीवनात रोज झगडणाऱ्या
माणसाच्या अंतःकरणात चैतन्य निर्माण
करून त्याला समाधान देणे
हे वाङ्मयाचे कार्य आहे."

— प्र. के. अत्रे

# बार्शी साहित्य संमेलन :
## डायरीतील काही पाने.

**राजन गवस**
बी. ए. भाग तीन.

– डोळ्यात गच्च पौर्णिमा. गाडी वाऱ्यावर तरंगत सुसाट सुटलेली. बाहेरच्या पौर्णिमेने मोगरीच्या फुलांचा सडा शिपलेला. डोळ्यातील पौर्णिमा आणि मोगरीचा सडा यांच्यात फक्त बसची काच. मी काचेशी मुक्तसंवाद करण्याच्या प्रयत्नात.

थट्टेखोर वाऱ्याच्या चाळ्यानं कानशिल बर्फ झाल्यावर चादरीशी तडजोड करून मी झोपण्याची निष्फळ खटपट सुरू केली पण पापण्यांनी संपापूर्वीची दक्षतानोटीस लागू केली. त्यावेळी जांभया देण्याव्यतिरिक्त मी अधिकारशून्य होतो.

गाडी भगवंताच्या बार्शीत स्थिरावली आणि एक दीर्घ जांभई दिली. हॉटेलात चहा घ्यावा म्हणून गेलो तर वेटरने हातातील पेले आणि बश्या फोडून आमचे स्वागत केले. शेवटी त्याच्याशीही तडजोड करावी लागली. पारोश्या तोंडाने चहा पिताना आईची आठवण झाली. डोळे तांबारून चुरचुरू लागल्याने जिवाच्या करारावर साहित्यसंमेलनाच्या स्थळी पोहोचलो आणि पहिल्या दिवसाची सुरुवात झाली.

### शुक्रवार १ फेब्रुवारी

सर्वत्र उत्साही वातावरण. अशातच प्रवासात कंटाळून शबनम सावरत येणारे प्रतिनिधी आणि रसिक. संमेलन शाहीर अमर शेख नगरात. संमेलनाच्या प्रवेशद्वाराची सजावट हा एक सर्वत्र चर्चेचा विषय. आसपास मिळणाऱ्या साध्यासुध्या वस्तूंच्या साहाय्याने उभारलेली तिन्ही प्रवेशद्वारं कुणाही रसिकाचं मन खेचून घेणारी. अशातच सर्वांच्या स्वागताला उभा असलेला शाहीर अमरशेखांचा पुतळा हे या सजावटीचं खास वैशिष्ठ्य.

सभामंडपात प्रवेश करताच बांबूंवर लटकावलेल्या काव्यपंक्तींनी डोळे खुडून नेले. चार–चार ओळींच्या काव्यपंक्तींच्या अनुषंगानं काढलेली आशयगर्भ चित्रं पाहिल्यानंतर कोणा रसिकाचा जीव त्यात गुंतला नाही तरच नवल!

मंडपात सनईचा सूर भरून राहिलेला. त्या सनईच्या सुरावर तरंगत प्रवेशद्वाराच्या बाहेर आलो आणि बाहेरच्या दहा–वीस स्टॉलनी लक्ष वेधून घेतलं. आपण कोणत्या जत्रेला तरी आलो नाही ना? अशी पुसट शंका बोचून गेली. अशातच 'साहित्य दिंडीच्या' घोषणा कानात घर करू लागल्या. लांबून का असेना दिंडी पहावी म्हणून रस्त्यावर आलो. ही दिंडी म्हणजे ऐतिहासिक प्रसंग, अभंग इ. अनेक प्रसंगांची गर्दीच. दिंडीपासून वळून भोजनमंडपात स्थिरावलो तर एक

वेगळेच दृश्य. वाढणारे, जेवणारे यांच्या बरोबरच ताटांचा चिवचिवाट !

सायंकाळचे चार वाजले आणि मुख्य मंडपात माणसांची गर्दी वाढू लागली. उद्‌घाटन कार्यक्रम सुरु झाला. अशातच साहित्यिकांचे रुसवे, फुगवे. अनिल (खवाट म्हातारा) उद्‌घाटनास आलेच नाहीत. 'कां' चं उत्तर शोधण्याचा प्रयत्न ही केला नाही. सुशील–कुमार शिंदेंचे दणदणीत भाषण हे या उद्‌घाटन समा–रंभाचे खास आकर्षण. त्यांचं भाषण संपलं आणि मला न पेलणारं दीर्घ सदतीस पानी अध्यक्षांचं भाषण सुरु झालं. मी काढता पाय घेतला. थोडीशी अस्वस्थ–ता वाढली म्हणून पाय मोकळे केले. मामासाहेब जगदाळे हॉस्पिटलला भेट दिली. (म्हणजे पेशंट म्हणून नव्हे तर हे आमचं निवासस्थान) गप्पा–टप्पा आणि चुना–तंबाखू यांच्या गर्दीतच दहा वाजायला आले.

जितेंद्र अभिषेकींची मैफल. ऐकायची म्हणून जाऊन बसलो. पहिल्या दोन गाण्याला जरा बरा वाटला कार्यक्रम . . . . " गुंतता हृदय हे . . . . " म्हटल्यावर मैफलीत पार हरवून गेलो पण पुढे डोळे साथ देईनात. तसाच उठून हॉस्पिटलमध्ये अॅडमिट झालो. विशाल मायेच्या शालीत देह पसरून मोकळा झालो.

## शनिवार २ फेब्रुवारी

मामासाहेबांच्या हॉस्पिटलमधील पोसलेले डास खूप रक्त प्याले. म्हणावी तशी झोपच लागली नाही. शेवटी मनाची समजूत घातली.

" आपण काय इथं झोपायला आलो नाही." आणि आवरा–आवर करत नऊ वाजता बाहेर पडलो. आज दोन कार्यक्रम एकाचवेळी. 'राज्यभाषा शाखा – संमेलन' आणि 'ग्रामीण साहित्यातील खेडं व वास्तवा–तील खेडं' यावर परिसंवाद. दोन्हीकडं ही थोडावेळ घालवण्याची कसरत सुरू केली. तुलनेनं ग्रामीण साहि–त्यविषयक परिसंवादाला खूपच गर्दी. त्या मानानं मुख्य मंडप ओस पडल्यासारखा.

गो. मा. पवारांनी केलेली प्रस्तावना रसिकश्रोते टिकवून ठेवण्यास फारच उपयुक्त ठरली. द. ता. भोसलेंच्या शैलीदार भाषणातून ग्रामीण साहित्यातील खेड्याचे दर्शन होते न होते तोच आनंद यादवांची चिंतनीय शैली श्रोत्यांना ग्रामीण साहित्याबाबत बरंच काही सांगून गेली. ग्रामीण साहित्य वास्तवापासून दूर जात असल्याची खंत बोलून दाखवत असतानाच ग्रामीण साहित्यात उपेक्षित असलेला 'नाटक' हा साहित्य प्रकार आज पर्यंत •एकाही साहित्यिकांने हाताळण्याचे धाडस दाखवले नाही यांचे दुःखही व्यक्त केले आणि श्रोत्यांच्या मनात आपल्या वक्तव्याचे हिंदोल निर्माण केले !

ग्रामीण साहित्यातील जिवंत अनुभवाचे चित्रण हे त्या त्या लेखकांनी ते जीवन जगूनच चित्रित केले आहे याचा श्रोत्यांनी पाहिलेला पुरावा म्हणजे महादेव मोरे.

वक्तृत्वाचा शाप असलेले महादेव मोरे, आपण साहित्य कसे निर्माण करु शकलो हे कथन करु लागले. श्रोत्यांनी शांत राहाण्याचे औचित्य दाखवले असते तर एका साहित्यिकाचे लेखन कसे खाजगी जीवनाशी निग–डीत असते हे ऐकाय मिळाले असते पण शेवटी महादेव मोरेंना थोडसं लाघवी हसून आपले कथन थांबवावे लागले.

अशातच महानोरना स्टेजवर आणले आणि श्रोत्यांनी टाळयांचा कडकडाटात त्यांचे स्वागत केले.

नव्या तरुण ग्रामीण लेखकांना प्रकाशक, संपादक कसे कुजवत असतात हे सांगून रा. रं. बोराडेंनी स्वतःचं लिखाण सध्या बंद का याचा खुलासाही केला. स्वतःचा खेड्याशी संपर्क तुटला म्हणून प्रामाणिकपणे लिखाण मी बंद केले, अशी कबुली देवून त्यांनी ग्रामीण साहित्याच्या प्रगतीच्या दिशाही कथन केल्या आणि

श्रोत्यांचे लाडके महानोर उभे राहिले.

ग्रामीण कथा आणि कादंबरी यांच्यात गुंतलेली चर्चा महानोरनी थोडीशी बाजूला काढून, ग्रामीण कवीता ही लिहीली जाते याची सर्वांना आठवण करुन दिली –

खराखरा खाजवीत
गिरमिण कथा आली
पचाकन थुंकताना
मुरका मारून गेली

या आपल्या ग्रामीण कवितेतून त्यांनी ग्रामीण कथेतील 'मागणी तसा पुरवठा' चव्हाट्यावर आणला. गांधारीचा संदर्भ देऊन बदलते खेडं साहित्यात यायला हवे ही अपेक्षा व्यक्त करुन ते श्रोत्यांना जिंकून गेले !

इकडे मुख्य मंडपात भांडणांना म्हणे ऊत आला होता. कोण बोलायला वेळ मागत होता. तर कोण त्याला अरेरावीची उत्तरे देत होता. कोण कुणाला 'फाजील' म्हणत होता, कोण 'दम' भरत होता, कोण शब्द माघार घ्यायला लावत होता.

अशातच राज्यभाषेतून व्यवहार करत असतांना होणारे विनोद, येणाऱ्या अडचणी यांच्यात श्रोते मश-गुल होत होते. या सर्व वातावरणात राज्यभाषा कोश तयार होत होता.

दुपारी आत्मचरित्रावर परिसंवाद झाला. या परिसंवादातील सर्वच भाषणे तशी अभ्यासपूर्ण. आत्म-चरित्र हा प्रकार अजूनही उपेक्षित आहे ही खंत सर्वांच्या वक्तव्यातून. आत्मचरित्र हे आत्मचरित्र असते काय ? यावर विविध मतं मांडली जात होती. ग. वा. बेहेरे तर म्हणाले, की –

'खरे आणि खोटे यांचे बेमालूम मिश्रण म्हणजे आत्मचरित्र !' त्यांच्या भाषणात टीकेचा भागच अधिक. इतरांनी मात्र आपली विद्वता दाखवली !

'आत्मचरित्र अजून चड्डीत आहे' असे एकजण म्हणाले तर —

'मराठीत अजून एकही आत्मचरित्र 'अस्सल आत्मचरित्र' या संज्ञेपर्यंत पोहचलेले नाही' असंही काही म्हणाले. मात्र सर्वांनी 'बलुतं' व 'आठवणींचे पक्षी' यांना डोक्यावर घेतले आणि हा परिसंवाद संपता झाला.

मोकळ्या वेळेत भगवंताचं दर्शन घेतलं आणि भोजन मंडपाची वाट धरली. इथं सारी मजाच. एक पंगत उठते तोच दुसरे त्याच ताटावर बसतात, वाढ-णारे "आणखी काय हवं?" असं त्याला पूर्वीचाच सम-जून विचारतात. तर कोण, "जरा ताजी चपाती आणा" "जरा तूप वाढा" "काय आमटी – – – !" असे किती तरी स्वर. अशातच भोजन आटोपलं आणि सुस्तावलेल्या अवस्थेत कविता ऐकण्यास बसलो.

कवीसंमेलन सुरू होण्यापूर्वी स्टेजवरील कवींची संख्या पाहाताच धसका बसला. थोडा गांगरलोहि अशातच मित्रांच्या सोबत कविता पचवू लागलो. सुरवात तशी रटाळ झाली आणि एक एक कविता सहनशीलतेचा अन्त पाहू लागली. परिणाम असा झाला की चांगले मोठे मोठे कवी यात ढेकणासारखे चिरडले गेले.

'वसंत आबाजी डहाके' किती गाजलेला कवी पण त्याच्या कविता म्हणजे श्रोत्यांचा छळ ठरल्या. गजमल माळींना तर प्रेक्षकांचा आरडाओरडा सहन करावा लागला. अशातच 'मनोहर 'ओक' श्रोत्यांच्या चर्चेचा विषय बनले. त्यांनी एका ओळीची कविता वाचली.

कवितेचे नाव " कोबी "
" गालात गालात गालात गालात गाल ! "

संपली कविता.

अशातच भाऊ पंचभाई, वसंत सावंत, किशोर पाठक असे कवी चांगले ठरले.

कवीसंमेलनाचा खरा बोऱ्या वाजवायला वशि–

त्यावर आलेल्या तेथील परिसरातील कवींनी ! बिचाऱ्यांची कीव करावीशी वाटली. कंटाळलेल्या श्रोत्यांना ताजेतवान केले ते महानोरनी––

' रान भलतच भरात आलय
पिकात धुडकुस घालून जा...'

या पहिल्याच छोट्या कवितेने अमाप श्रोत्यांच्या कानाचे पारणे फेडले. अनिलांनी प्रसंगाला अनुलक्षून

" सारेच दीप कसे मंदावलेत ... " ही कविता

म्हणून दाद घेतली. तर नारायण सुर्वेंची 'पोर्टरची स्वगते' सर्वांना अपील झाली ! आणि हे कवी संमेलन दोन फेब्रुवारी संपवून मोकळे झाले !

## रविवार ३ फेब्रुवारी

आज संमेलनाचा तिसरा दिवस. सकाळीच दलित शाखा संमेलन आणि नवोदितांचे काव्य–वाचन असे एकाचवेळी दोन कार्यक्रम.

'दलित शाखा संमेलन' भरवावे की नाही, यावर वादंग माजल्यामुळे नकळतच या दलितशाखा संमेल–नाविषयी आतुरता निर्माण झाली होती.

'दलित शाखा संमेलनाला थोड्याशा तणावाच्या वातावरणातच सुरुवातच झाली. प्रा. कवठेकर यांच्या अभ्यासपूर्ण भाषणाने हा परिसंवाद सुरू झाला. संचलन बाबुराव बागुल करत होते. प्रा. टोंबरेनी दलित वाङ्–मय गतिशील आहे याची योग्य कदर केली पाहिजे. त्याची समीक्षा बदलली पाहिजे असे साचेबंद विचार मांडले. मात्र सर्व चर्चेचे लक्ष ठरले ते डॉ. भालचंद्र फडके. आपल्या विचारगर्भ वाणीने श्रोत्यांना मंत्रमुग्ध करता करता दलितांची भाषा–भाषा म्हणून स्वीका–रायला काय हरकत आहे ? असा महत्वाचा सवाल त्यांनी केला. प्रा. अर्जुन डांगळे बोलत असतानाच दलित पँथरचा मोर्चा बाहेर आला.

स्वयंसेवकांचे कडे, पोलीसांचा गराडा, अशात मोर्चातील ६०–७० लोक तिथंच थांबले आणि स्वत: गं. बा. सरदार तेथे दाखल झाले. चर्चेचा मूड यामुळे थोडासा गेल्यासारखा वाटला. त्यामुळे मी नवोदितांच्या कवीसंमेलनाकडे गेलो. तिथं तर नवकवींना (श्रोत्या–कडून) हैराण करण्याचा बहारदार कार्यक्रम चालू होता. महानोर आपली सर्व कौशल्ये पणास लावून परिस्थिती हाताळत होते.

दुपारचे जेवन खमंग झाले म्हणतात, कारण यावेळी मी तुळजापूर गाठण्याच्या खटपटीत होतो. भवानी माते–च्या दर्शनाची आतुरता तर होतीच त्याबरोबर पाचच्या आत संमेलनाचा मंडप गाठण्याची हुरहूर होती.

अळम्–टळम् करीत आमची सहाजणांची तुकडी तुळजापुरात दाखल झाली. देवालयाची रचना खूप आवडली. तिथल्या दगडांच्या आख्याइका, भाविकांची गर्दी. अशातच पैशामागं धावणारे पुजारी– त्या साऱ्यांची टिंगल करत परिसर निरखून घेतला आणि स्टँडच्या आवारात फराळाचा चक्काचूर केला. कसा–बसा हा कार्यक्रम आटोपून पाचच्या पूर्वीच साहित्य–संमेलनाचा मुख्य मंडप गाठला.

कार्यक्रम सुरू होण्याच्या मार्गावर होता. प्रास्ता–विक, निवेदने, आटोपली, ठराव झाले, सत्कार झाले. आणि संमेलन उधळण्याचे अयशस्वी प्रयत्न सुरू झाले. ३०–४० महिला खूप ओरडत होत्या. हवं ते म्हणत होत्या. पन्नालाल सुराणा त्यांना समजावण्याचा संयमी प्रयत्न करीत होते. शेवटी नाईलाजानं त्यांना अटक केली आणि फोटोवाल्यांची चैन उडाली. अशातच सरदारांच्या भाषणाला सुरुवात झाली– – –

सरदारांचे समारोपाचे भाषण म्हणजे उत्स्फूर्त उद्‌गार. अंगार शहारे आणणारे भाषण सरदार एका वेगळ्याच आवेषात करीत होते. त्यांच्या व्यक्तीमत्वाचे पैलू, मतप्रणाली आणि वैचारिक बैठक यांचे दर्शन त्यांच्या शद्बाशद्बातून होत होते; कुठेही क्रोध नाही तिरस्कार नाही मात्र धीर-गंभीर आवाजात ते बोलत–

होते. त्यांचे भाषण सर्वस्पर्शी वाटले. भाषण संपले आणि संमेलन ही संपले.

त्या संध्याकाळी खूप हिंडलो. वसंत सावंतनी खूप कविता ऐकवल्या. मित्रपरिवारात गप्पांचा बहर, त्यांच्या सोबत शेवटचे जेवण, नव्या ओळखी, ओळखीचे मैत्रीत रुपांतर आणि शेवटी खंडोबाचं लगीन होऊन साहित्य संमेलन संपलं आणि शेवटची रात्र मामासाहेब जगदाळे हॉस्पिटलच्या वाळूत स्वप्नांच्या छायेत आणि उबदार मायेत घालवली !

संमेलनात काय मिळाले? संमेलन सुरळीत पार पडले(?) संमेलनात फक्त साहित्यिकांच्या भांडणाच्या झलकीच दिसल्या–? अशी संमेलने समाजाला काय देतात–? अशा अनेक प्रश्नांचे किडे डोक्यात लिवूलिवू लागले.

–पंढरीच्या विठ्ठलाला भेटून जायचं म्हणून बसमधून पंढरीत पाय टाकला आणि गलिच्छतेने डोळे विटून गेले. बॅगा सावरत सावरत स्टँड सोडलं आणि देवळाची दिशा धरली.

–विठ्ठलाविषयी नितान्त आदर, संतांच्या साहित्याने भारावलेलं मन, अशा श्रद्धांचें गाठोडे घेऊन विठोबाच्या दारात उभा राहिलो आणि सारी श्रद्धा, आदर धुळीत विलीन झाले. भामट्यांची लफंगी चाल ही याचं महत्वाचं कारण.

'अंगारा लावण्यास पैसे, तीर्थ घेण्यास पैसे चप्पल ठेवण्यास पैसे,' इथल्या साऱ्या माणसांना पैशाचा महारोग जडलाय !

आम्ही देवळात आत जाणार तोच 'हार घ्या माळ घ्या...' म्हणत एक म्हातारी आली. मी ही पंढरीचा भामटा झालो आणि त्या म्हातारीला चकवून माझ्याकडे असलेल्या बहिणींच्या शबनममध्ये चार हार चोरून घातले. अर्थात हे सारं विठ्ठलासाठी.

तिथं मला सारखं वाटाय लागलं आमच्या ग्रुपमध्ये माझा एखादा तरी बिलंदर मित्र आला असता तर भामट्यांची फजिती पार केली असती. पण काय करणार ?

इथं कोणत्याही मूर्तीला हात जोडावा असं सुद्धा वाटेनासं झालं मात्र पाहाण्याची उत्सुकता संपली नाही. कैकाडी महाराजांचा मठ तसा फार विलोभनीय. कलेचा स्वैर विलास. पण मठात एके ठिकाणी– यशवंतराव–तुकाराम, रत्नापा कुंभार–गोरा कुंभार यांच्या तुलना साम्यात्मक रीतीने केलेल्या वाचल्या आणि मठ पाहाण्याचं सोडून दिलं–

नंतर चंद्रभागा होडीतून मनसोक्त पाहिली. अशातच होडीत रंगलेलं कवी संमेलन आणि गोपालपूरचा देव हे सारे प्रसंग आठवणीचे ठसे कोरुन गेले !

विठ्ठलभक्त बडव्यांना शिव्या देणे, बार्शीतील आठवणींचे विनोद करणे, प्रासंगिक हास्याचे स्फोट करणे आणि अवांतर गप्पा मारणें अशात रात्रीचा एक वाजला.

विठ्ठलाला आणि त्याच्या भक्तांना कायमचा नमस्कार करुन गाडीत बसलो. ताईच्या, बाईच्या आणि मित्रांच्या सोबतीतील हे साहित्य संमेलन आयुष्यातील एक कोरीव आठवण हृदयावर कोरत गाडीचा अंदाज घेतला.

गाडी भरधाव. बाहेर पंढरीच्या बुक्क्यासारखा उधळलेला अंधार — — — मनात सोनेरी जग संपून वैतागी जगाची चाहूल – — अशा अवस्थेत ते सोनेरी क्षण आयुष्याच्या सोबतीसाठी जपून घेऊन आलो ! अन्तापर्यंतची आठवण म्हणून — — — — !!

●●

# न शी ब

**श्रीकांत बाबाजी सावंत**
बी. ए. भाग तीन.

गांवातल्या शेंबड्या पोरांची लग्न झाली पर माझ्या राम्याच कधी हुयाच म्हणून गुरवाची म्हातारी कपाळावर हात मारुन सांगत होती. ' सारजा, कस काय गं ? कधी हुयाच माझ्या राम्याच लगीन ? "
" आज न्हाव उद्या कधी होईल. योग यावा लागतो. "
सारजा कपाळावर आठ्या उमटीत म्हणाली.

" शंकरभटजी म्हणतोय गुरूबल न्हाय. शनिपिडा हाय. गजानन भट सांगतोय लगीन रेषा दूर हाय. आता काय कराव ? चार-सहा ठिकाणची सुत – गोत जमायं न्हाईत. आता चार दिस झालं कळब्यांच्या पावण्यानी लेक दियाची कबुली केलय खरं कागुद बी आला न्हाय – – – – "

रामु धोंडीराम गुरव, म्हणत पोस्टमनन लखोटा म्हातारीच्या हातात दिला.

" ए सदू एवढा कागुद वाचून दाखीव बघू ? म्हातारीन शेजारच्या सदूला बोलावलं. सदून लखोटा उघडला नी सदू वाचू लागला.

ति. आजीला

कळब्यांच्या पावण्याचा नमस्कार

वि. वि.

आता पत्रस कारण की मी रामूला मुलगी दियाची ठरवली. तुमच्या विश्वासान व माणुसकी खातर मी ह्या कार्याला उभा आहे. तरी या आठवड्यातच सुमुहूर्त असल्याने त्याला तारेने बोलाविणें. लगीन तयारीला लागा. ठरावाप्रमाणे सर्व कबुली आहे.

कळावे.

आपला विश्वासू

**धानबा कदम**

बाबा ! सदू बघितलास. किती पावणं बघीतल पंर ह्येच्यासारा इमानी माणूस न्हाय. नशीबात असल की चार दिसात बी हुतय आणि नसल तर बारा मासात बी हूत न्हाय. बाकी तू चंदगडला जावून ताबडतोब तारेच–गिऱ्याम कर. लागतील ते पैसे घेऊन जा.

म्हातारीच्या सागण्यावरून तार पोहोचताच एक महिन्याच्या रजेवर रामू मुंबईहून आला. गडबडीत लग्न ठरविल्याबद्दल चार अस्सल शिव्या हासडून त्यानं म्हातारीला गार केलं. रामू तसा व्यवहारात–काम–धंद्यात हुशार पण वागण्या बोलेण्यात जरा आडकचरा–च होता.

अखेर १५ मे हा लग्नाचा दिवस उजाडला. रामनं साठविलेले एक हजार रुपये या कार्याला लागत

होते. म्हातारीच्या गोतावळ्यातले पै- पाहुणे जमलं होतं. आज म्हातारी नव्या लुगड्यात लगीन मंडपात हिंडत होती. सनई-चौघड्याच्या मृदू तालावर म्हातारीचं चालण्याच संगीत घाईगर्दीत चाललं होतं. गरडाची हौसा-रामूची मावस बहीण फराळ-चहापाण्यात मग्न होती.

अखेर थाटामाटात लग्न झालं, घरात आलेले पाहुणे हळूहळू विरळ होऊ लागले. म्हातारीचा चेहरा या आनंदानं उजाळला होता.

"बाकी सोनं हे मातीतच दडल्यालं आसतयं, पिवळ्या सोन्यावानी न्हवं आक्षी हिऱ्यावानी सून मिळाली, नशीबात आसलं की हुतय बघं" म्हातारी गरडाच्या हौशाला सांगत होती, आणि एक आशा हाय बघ- एकदा नातवाच त्वांड बघीतल की खुशाल डोळं झाकींन म्हणतो, आसल दुसर सुख कुठ हाय ?"
"मावशे, आता नव्या सुनंला सांभाळून घियाच तुझ्या हातात हाय, रुप्यावाणी सून मिळाली, संसार सुखाचा करा-कामाधंद्याची घाई करु नगस, शेतावरल्या घरात संभाळून वागा-" असा सल्ला देऊन गरडाची हौसा गवस्याला आपल्या घरी गेली.

मृगाच्या धारेचो सुरूवात झाली. हळू-हळू एक महिनां संपत आला. शेता-शिवारात पाखरावानी माणसं हालत होती. पेरणीची कामे सुरू झाली. म्हातारीन ही शेतावरचो कामे संपवली. कळंब्याचं पावणं भेटून गेलं. पावसाळ्यानंतर ते गजराला घेऊन जाणार होते. पै-पाहुंण्याची वर्दळ संपली. अखेर रामूचा जायचा दिवस उगवला. रामून आईला शेतीवाडोकड लक्ष दद्यायला सांगितलं-

"मुला, संबाळून वाग, न्हायतर आजकालच दिवस वाईट हायत, कामाधंद्यावर जपून जा नि लागुपाठ कागुद धाल म्हणून म्हातारीनं पुसत्या डोळ्यानी त्याला निरोप दिला. गजराही वेशीपर्यंत पोहोचवायला आली होती, मान मुरडत लचकत हातानं निरोप देत तीही माघारी वळली.

सुनबाईबरोबर सुखानं नांदत किती काळ गेला हे म्हातारीला समजलं देखील न्हाई. वाऱ्या-वावटळीसारखे दिवस निघून जात होते. म्हातारीच बाहेरच्या जगाशी सुतराम संबंध येत नव्हता. म्हातारीचं डोकं दिवसेंदिवस स्थिरावत नव्हतं. म्हातारी शेतावरच्या घरात राहत होती. सभोवती शेती व मध्ये टुमदार घरटं याच्यात म्हातारी राहायची. गजराचा चेहरा ऐन तारूण्यान दिवसेंदिवस फुलत होता. एके दिवशी सकाळी सुनबाईच्या पोटात दुखतंय म्हणून म्हातारीची गडबड सुरू झाली. गजरा बाळंतपणासाठीच बसली. म्हातारीला आनंद झाला, आनंदानं फुललेला म्हातारीचा चेहरा सुखावला होता.

"बाज बघूनशान बाळत हुयाला बसल्यावाणीच वाटतं" म्हातारी विनोदानं म्हणाली. कशी दिस-मास गेलं कळलं दुकाल न्हाई. म्हातारीनं सुनेच्या बाळंतपणाची तयारी केली. मोत्याचा तुरा, चंद्रावाणी हिरा नातू झाला. म्हातारीचा आनंद गगनात मावेना, म्हातारी स्वतःशीच हसायची. पै-पाहुण्यांना कळवायला देखिल तिला सुचलं न्हाई.

चार दिवसानं म्हातारीनं सागितलं-
"ए, सदू आणि एक तारेच गिन्याम कर-आणि लिव, तुझं नशीब उघाडलं चंद्रावाणी पोरगा झाला."

सांगकाम्या सदू विचार न करताच तार करून आला. म्हातारीन गाठीला ठेवलेले ५० रू. बारश्याच्या बाजारासाठी खर्च केले. आठ-दहा दिवसात सुनबाईची राणीपरास व्यवस्था केली. गरडाच्या हौसाला न कळवताच बारसं घालण्याचं म्हातारीन ठरविलं. बारश्याच्या दिवशी म्हातारी नव्या लुगड्यात होती पण गजराचा चेहरा काळवंडला होता.

म्हातारी चार बायांना सांगायला निघाली.

"पोरं काय उगीच हुत्यात व्हय, त्याला नशीब लागत. आमची पुण्याईच थोर म्हणून एवढ्या लवकर नातू झाला. न्हायतर नवसान बी मिळत न्हाय, आज म्हातारा असता तर ब्येस हुईत, त्येला पोराबाळाची लई हौस, झाकल्याल नशीब उघाडल्यावानीच झालं"

"ए, परबावती, लता, शेवंता पोराबाळांना घिऊन येवा, म्हाशीला तर जमायच नाही." म्हातारी सगळयाना सांगत सुटली. म्हातारीन गोडच्या जेवणाची सोय केली होती. म्हातारीन पाळण्याची तयारी केली. प्रभावती, लता,शेवंता चार दोन पोरं बरोबर घेवून आल्या होत्या.

" आजी नांव काय ठिवू ग ? प्रभावतीनं प्रश्न केला. आक्षी दगडावानी राहू दे आणि म्हाताऱ्याच नांव बी चालू दे, ' धोंड्या ' ठिवा. अग असल्या कामाला घाई करायची असते. पाळणा म्हणा जेवल्या बिगार कुणी जाऊ नगासा. "

लता प्रभावतीनी रामकृष्णाचा पाळणा म्हटला. पोरंबाळं जेवणाची वाट बघत होती. अखेर जेवणं झाली नी ह्या फुकटखाऊ गेल्या.

दुसऱ्या दिवशी पाणवठ्यावर सखु म्हणाली–

'गुरवीनीची सून बाज बघूनशान बाळंत हुतीया. अग ! मिरगाच्या आधी पंधरा दिवस लगीन झाल नी दसऱ्याच्या अगोदर बाळंत हुती म्हंजी चमत्कार हाय.'

"अग सखी ! पोर काय अंगाऱ्यानी हुत्यात, मला जरा शनखा हुती. बाई जरा चालू दिसायची. दुसऱ्याच बोलूनशान पापाला धनी का ग हुयाच ?" तोंडावर हात धरून रत्ना म्हणाली.

जिथं–तिथं गावाघरात गुरवाच्या सुनेची चर्चा सुरू झाली. हां–हां म्हणता गरडाच्या हौसाला पत्ता लागला.

कंबर बांधुन वेशीत उभ राहून हौसान म्हातारीची अब्रुच काढली. "साठी नि बुद्धी नाठी, साठावर गेलीस नि अक्कल विकून आलीस, आज घराण्याच्या अब्रूचा पंचनामा झाला. आणि वर मिरवाय बारसं घालतीस. आजूबाजूच्या या साळुंख्याच नि डोचकं न्हाय का ? ह्या फुकटखाऊ बारसं कराय आल्त्या त्यांचबी डोचकं फिराय गेलंत का ?"

"देवळातली गेली घाट – – – ह्याना काय ? म्हातारी मेली आसतीस तर ब्येस झाल असत पर जगुनशान अब्रु घालवू नगस. 'फुकटच गाव नि मायलेकी धाव' तशा बारशाला आल्त्या. मी असते तर झिज्या उपटूनच काढल्या असत्या. अशा त्वांड दाखवाय यिवू देत, गप्प बसणारी न्हव नांवची–हौसा हाय हौसा."

म्हातारी कपाळावर हात मारुन घेत नशीब ऽऽ नशीब ऽऽ म्हणून ओरडू लागली. संध्याकाळी म्हातारीच्या अंगात बेफाम ताप चढला. सदूची तार पोहचताच रामू रागान डाफरतच आला.

" अडाणी आई आणि घर वाया जाई, आई ऽऽ आवंदा लगीन राहचलं असत तर लई ब्येस झालं असतं खर ह्यो उजेड केलीस उजेड – – – "

" आता बोंबलू नगस नशीब ऽऽ म्हणून ',

" दादा, तुझ्या नशीबातच आस हूत, म्हातर काय ? आई तरी त्याला काय करणार ? " गरडाची हौसा सांगत होती.

म्हातारी बेफाम चढलेल्या तापान तडफडत होती. माजघरातल्या खोलीत गजराच्या हुंदक्याचा आवाज येत होता. रामू डोकं धरुन म्हातारी समोर बसला होता. साऱ्या घरात भयाण शांतता पसरली होती-

●●

# लोकनायक जे. पी.

राजाराम व. पाटील
बी. कॉम. भाग २

गंगानदी बिहारमध्ये प्रवेश करते आणि वाहत वाहत बंगालमध्ये जाते. तिथपर्यंतच्या खास भू-भागास 'दियारा' म्हणतात. चारी बाजूंनी गंगेचे पाणी व मध्ये असलेली हिरवीगार भूमी, येथील सारे जीवन गंगा-माईच्या लहरीवर अवलंबून आहे. तेथे शरयू नदी गंगेस येऊन मिळते. या पवित्र संगमस्थानी असलेल्या 'सिताब दियारा' या गावी जयप्रकाशजी जन्मले. हल्ली त्या गावास लोकांनी प्रेमाने 'जयप्रकाश नगर' नाव दिले आहे.

लोकनायकांचे वडील बाबू हरसूदयाल व माता फुलराणी म्हणजे मूर्तिमंत सौजन्य आणि प्रेम. ११ आक्टोबर १९०२ रोजी जयप्रकाशांचा जन्म झाला. गावात प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यावर ते पाटण्यास पुढील शिक्षण पूर्ण करण्यासाठी गेले. जयप्रकाशजी एक नियमित अभ्यासू हुशार विद्यार्थी म्हणुन ओळखले जात. शिकत असताना त्यांच्या मनात देशसेवेची भावना रुजत होती.

त्यावेळी देशात सर्वत्र क्रांतिकारकांचे उठाव व स्वातंत्र्याचे वारे पसरले होते अशावेळी जयप्रकाशांचे मन कसे शांत राहणार ? त्यांचे मन एकीकडे क्रांति-कारकांच्या रोमांचकारी जीवनाकडे ओढ घेत होते. तर दुसरीकडे गांधींच्या जीवनातील साधेपणा व वैराग्य यांची मोहिनी यामध्ये गुंतत होते. गीतेबरोबर सामा-जिक, ऐतिहासिक व राजकीय पुस्तके यांचे त्यांनी वाचन करण्यास सुरवात केली. जे काम करावयाचे ते अगदी मनापासून आणि जास्तीत जास्त चांगले करण्याचा प्रयत्न करावयाचा ही त्यांची लहान-पणापासून वृत्ती होती. त्यांनी गांधींच्या बहिष्काराच्या चळवळीत भाग घेऊन कॉलेजला रामराम ठोकला. पुढे परत ते बिहार राष्ट्रीय विद्यापीठात दाखल होऊन परीक्षा उत्तमरीत्या उत्तीर्ण झाले. त्यांनी पुढील शिक्षण अमेरिकेत घेतले.

१६ मे १९२२ रोजी जपानमार्गे परदेशीगेले. तेथील स्वच्छता, साधेपणा, कामाचा उरक, विनय आदि गुणांची त्यांच्यावर छाप पडली. अमेरिकेत गेल्यावर त्यांना वर्णभेदाचे हिडीस स्वरूप पाहून धक्का बसला. जे. पीं. वर पैशासाठी मजुरी करण्याची वेळ आली. सुट्ट्यांच्या मळ्यात ते दहा – दहा तास काम करीत. पाच – सहा भारतीयांचे विद्यार्थी मंडळ स्वावलंबनाने शिकत असे. फर्निचर साफ करणे, रंग पॉलीश करणे, संडास सफाई, कुंभारभट्टी, लोखंडाचे कारखाने येथे शारीरिक कष्टाचे काम करून त्यांनी शिक्षण घेतले. याच वेळी माणसाला काम करण्याची इच्छा आहे, शक्ती आहे. तरीही काम

करून चांगले जीवन जगण्याची संधी का मिळू नये. या विचाराने ते अस्वस्थ झाले व त्यांचा मार्क्सवादाकडे कल होऊ लागला. मी विज्ञानाची पदवी मिळवून. स्वदेशी गेलो तरी त्यातुन माझ्या गरीबगुरीब जनतेची सेवा कशी होईल ? गरीबी कशी दूर होईल ? बेकारी कधी संपेल ? नव्या समाजाचे नवनिर्माण झाल्याखेरीज हा प्रश्न सुटणार कसा ? या विचाराने ते समाजशास्त्राकडे वळले. त्यांचा समाज परिवर्तनावरील प्रबंध उत्कृष्ठ ठरला होता. पण इकडे आई आजारी असल्याची वार्ता आली म्हणून ७ वर्षानी मायभूमीकडे वळले. परतल्यावर त्यांनी प्रतिज्ञा केली. श्रमगारांची संघटना करुन समाजाची रचना बदलावयाची, गरीबी दैन्य, विषमता दूर करायची.

जे. पी. अमेरिकेत असताना जे. पीं. च्या पत्नी प्रभावतीदेवी या कस्तुरबा गांधी यांची मानसकन्या बनून देशासाठी व्रतस्थ जीवन जगत होत्या. जे. पीं. नी गांधींच्या सल्यानुसार १९३० सालच्या सत्याग्रह लढ्यात त्यांनी उडी घेतली. जे. पी. ना भारतमातेच्या हवाली करुन त्यांची माता फुलराणी देवाघरी निघून गेली. १९२१, १९३० व १९३२ चे आंदोलनात अनेक तरुणांनी भाग घेतला. हे आंदोलन नव्या दिशेने न्यावे लागेल. किसान–कामगार, स्त्रिया, विद्यार्थी यांची सेना या मागे उभी राहिली पाहिजे असे त्यांना वाटे. १९३४ ला बिहारमध्ये प्रचंड भूकंप झाला तेव्हा भूकंपपीडितांसाठी जे. पी. नी खूप कष्ट केले. ते म्हणत, 'हिंदुस्थानात गरीबी आहे, एवढेच नव्हे तर एकीकडे उपासमार आहे तर दुसरीकडे प्रचंड संपत्ती आहे. उत्पादनाची सर्व साधने इथेही मूठभर लोकांच्या हातात आहेत. आर्थिक, सामाजिक विषमता आहे. केवळ स्वातंत्र्याने ती जाणार नाही, तर त्यासाठी दीर्घकाळ प्रयत्न करावे लागतील.

१९३९ साली जागतिक युध्दाचे ढग जमले धरपकडीत जे. पी. ना नऊ महिन्याची शिक्षा झाली. पण काही दिवसांतच त्यांनी दिवाळीच्या दिवशी पाच निवडक लोकांबरोबर तुरुंगातून पळून जाण्याची योजना आखली. दिवाळीच्या आनंदात पहारेकरी गाफील होते. संकेतानुसार मंडळी उंच भिंती चढून पलीकडे गेली. सरकारने त्यांना फरारी ठरवून पकडण्यासाठी दहा हजारांचे बक्षीस लावले पण ते गावोगांवी हिंडून "आझाद दस्त्याचे" काम करत होते. त्यांनी सहकाऱ्यांसह कलकत्ता गाठले. तेथील बंगालचा भीषण दुष्काळ पाहून त्यांना अतीव दुःख झाले.

'महात्माजींनी या देशाला दिलेली नैतिक मूल्याची साधनशुद्धीची देणगी सर्वात थोर आहे' असे ते म्हणत, जनतेच्या अन्नवस्त्राची तरतूद करताना नैतिक ध्येयाची स्फूर्ती हवी. कार्यकर्त्यांच्या विविध विधायक विशुद्ध चळवळीतून खरी लोकशाही अवतरेल असा त्यांचा विश्वास होता. कामगार संघटनांना त्यांनी नेतृत्व दिले. जमीनदारी विरूद्ध उत्तरप्रदेश, बिहार येथे किसानांना संघटीत केले विधायक कामाने सबंध देशाची स्फूर्ती, शक्ती, उत्साह जागृत करता आला तरच समाजवाद येईल, या खात्रीने ते ग्रामीण रचनात्मक कार्यात लक्ष घालीत.

१९५१ मध्ये वर्ध्याला येऊन त्यांनी विनोबांच्या साम्ययोगाचा कांचनमुक्तीचा प्रयोग पाहिला. समानतेबरोबर श्रद्धा व परस्पर स्नेह करता येईल. माणसाला सदाचारासाठी प्रेरणा कशी देता येईल, याचा ते शोध घेऊ लागले. जे. पीं. चा भूदानात प्रवेश ही एक ऐतिहासिक घटना होती.

जे. पीं. च्या पत्नी प्रभावतीजी म्हणजे म. गांधी व जे. पीं. ना जोडणारा दुवा होता. विवाह होताच त्या बापूंच्या परिवारात आल्या. त्यांनी सत्य, अहिंसेचे धडे गिरवले. जे. पीं. ना सर्वोदयाकडे नेण्यात त्यांचे मूक, खंबीर, सत्याचरण व प्रखर तत्वनिष्ठा यांचा मोठा वाटा आहे. म. गांधींनी प्रभावतीजींना सांगितले. जे. पीं. चा सांभाळ हीच तुझी राष्ट्रसेवा या आज्ञेचे प्रभावतीजींनी तंतोतंत पालन केले.

जे. पी. नी जिथे जिथे ज्या ज्या स्वरुपात

अन्याय दिसला त्याला प्रतिकार करण्याचे जिद्दीने प्रयत्न केले. हिंसा आणि अन्याय जीवनाच्या सर्व क्षेत्रांतून जावा व मंगलता यावी म्हणून त्यांनी सर्वोदय विचार स्वीकारला. तो विचार त्यांनी परदेशात जाऊन मांडला. चंबळच्या दरोडेखोरांनी जे. पीं. च्या प्रेरणेने आपले समर्पण केले. ही घटना साऱ्या जगाला विस्मयात टाकणारी आहे. राजनीतिला लोकनीतीचे अधिष्ठान हवे, अशी जे. पीं. ची शाश्वत निष्ठा होती.

जे. पीं. चे व प्रभावतीजींचे दांपत्यजीवन मोठे मधुर, अद्भुत व अलौकिक होते. शेवटी शेवटी जे. पीं. ना सांभाळणे व सतत त्यांच्या बरोबर राहणे हेच प्रभावतीजींचे जीवनकार्य झाले होते, म्हणून १५ एप्रिल १९७३ रोजी त्यांचे निधन झाल्यावर जे. पी. च्या जीवनात कधीही भरून न येणारी पोकळी निर्माण झाली. त्यानंतर त्यांनी समग्रक्रांतीच्या कार्यात स्वतःला झोकून दिले व बिहारमध्ये राजकीय व प्रशासकीय भ्रष्टाचार निर्मूलनासाठी तरूणांचे नेतृत्व पत्करले. देशहितासाठी विरोधी पक्षांत ऐक्य घडवून आणण्याचे कार्य त्यांनी केले व लोकशाहीत पर्यायी पक्षांची आवश्यकता पटवून दिली. त्यांनी संधी येताच प्रचंड प्रमाणांत लोकजागृती केली व देशात शुद्ध लोकशाहीचा पाया घातला. समग्रक्रांतीचे ध्येय डोळ्यासमोर ठेवून त्यांनी आमरण जनसेवेचे व्रत पूर्ण केले. अशा या थोर पुरुषाला जनतेने 'लोकनायक' पदवी देऊन आपल्या हृदयात कायमचे मानाचे स्थान दिले.

●●

---

Statement about ownership and other particulars about newspaper Shivraj Miscellany of Shivraj College, Gadahinglaj to be published on the 25th day of April.

Form NO. IV ( Rule No. 3 ).

| | |
|---|---|
| Place of Publication: | Shivraj College, Gadahinglaj. |
| Periodicity of Publication: | Annual. |
| Printer's Name: | Zunjar Printing Press, Nipani. |
| Nationality: | Indian |
| Address: | Tanaji Chowk Nipani. |
| Publishers Name: | Prin. B. B. Deshmukh. |
| Nationality: | Indian. |
| Editor's Name: | Sou. M. N. Kotibhaskar. |
| Nationality: | Indian. |
| Address: | Shivraj College, Gadahinglaj. |

I, Prin. B. B. Deshmukh, hereby declare that the Particulars given above are true to the best of my knowledge and belief.

B. B. DESHMUKH.
Signature of Publisher.

---

# निर्माल्य

**अरुण हिरेमठ**
बी. कॉम. भाग २

रात्रीचे थंडगार वारे सुखावत होते. अमोलची गाडी सातान्याच्या दिशेने भरवेगाने निघाली होती. पाश्चात्य संगीताच्य तालावर टिचक्या वाजवत- वाजवत अमोल देहभान हरपून गाडी चालवीत होता. मी देखील प्रेमवर्षावात न्हाऊन निघाले होते. संगीताच्या तालावर भावी जीवनाचे वलय अमोल आणि माझ्या डोळचा– भोवती फिरत होते. भावी स्वप्नांचे मनोरे रचता रचता गाडीचा वाढलेला वेग त्याच्या लक्षांत आला नाही. त्यामुळे वळणा आडून भरवेगाने येणारी ट्रक देखील त्याला दिसली नाही. बघता बघता गाडीचे तुकडे–तुकडे झाले. अमोलला जबरदस्त मार लागला होता पण सुदैवाने मी मात्र बचावले होते.

कदाचित या दीपाची नियतीने चेष्टा केली असावी. कारण माझा 'अमोल' काळाने हिरावून घेतला होता. आणि आज हवेत विरून गेलेले स्वप्नांचे सूर –– भैरवीत आळविण्याचा मी प्रयत्न करीत होते – – – आणि क्षणभर – – – अमोलच्या सहवासातील प्रत्येक क्षण माझ्या डोळचासमोर तरळू लागला.

– – सभोवती सुंदरशी बाग – – त्यात आमचं टुमदार कॉलेज – – गावापासून थोडं दूर असलेले –– परीक्षेचे वारे निघून गेले होते – – एक प्रकारच्या धुंदीच्या वातावरणाने भारलेली दुनिया –– एक दिवस – – तो बागेत बसला होता – – पाठमोरा – – – खरच ! त्याची बसण्याची ऐट किती रुबाबदार – – सर्वत्र पसरलेली हिरवळ – – अन् त्यावर त्याचा गर्द आकाशी रंगाचा शर्ट – – मी वेडावून गेले – – अखेर मी एक मुलगी होते – – रंग आवडतो म्हणून का कुणावरही भुलावं ? – – संस्काराचे ओझं सहजी फेकून देता येत नाही – – इतक्यात स्मिताच म्हणाली. "अग ! दीपा, वेडाच दिसतोय, काय विचार करीत बसलाय बघ ! " मी मनातून चिडले होते. ओळख नसताना अशी कुणाचीही थट्टा करायची म्हणजे ? "हं ! वेड्या माणसाची वेडी दुनिया तुम्हाला कशी कळणार ? "

खरंच ! किती छान बोलला तो – – घारे डोळे रोखून बोलत होता तो – – त्याच्या नजरेतील प्रीतीची भाषा मला मोहून टाकत होती. – – ते डोळे नुसतेच पाहत होते की ? काही सांगत होते – – अन् आंत कुठंतरी मनाला सुखावह वाटत होते.

" माफ करा ! माझ्या मैत्रिणीला जरा थट्टा करायची सवयच आहे बर का ? "

" – – छे ! माफ करा म्हणून ? चुकीला प्रायश्चित असतंच नाही ? "

" – – पण ! ! शिक्षा तरी काय करणार ? "

आपले उडणारे केस सावरीत मुखस्तंभासारखी मी बघतच राहिले. त्याला मात्र गोंधळाची कल्पना नव्हती
" बसा ना "
कुठं ? त्याच्या शेजारी ? अन ओळख नसताना ?
" नाहीतर असं करू — — कॉफी घेऊया चला "
" नको ! घरी उशीर होईल ! "
खरं म्हणजे घरी काहीच काम नव्हत — — उशीर झाला तरी थाप मारली असती. — — मग आईचे शंभर प्रश्न — — कुठे गेली होतीस ? ... बरोबर कोण होत ! — पण कॉफी घेता घेता त्याचा सहवासही गोड वाटू लागला. " पुन्हा भेटाल ना ?"
ही ऑफर स्वीकारायला हवी — अस वाटू लागलं—— बऱ्याच वेळा काही आग्रह इतके हट्टी असतात की ते सरळपणे नाकारता येत नाहीत.

काही दिवसानंतर — — —
" काँग्रॅट्स्, मिस् दीपा — — सेमीस्टरला फर्स्ट आल्या-बद्दल — — पुन्हा एकवार मनापासून अभिनंदन !!"
" थँक्स् "
मी गोंधळलेली होते — माझ्या अगोदर त्याने रिझल्ट आणला होता — —
" फक्त कोरडे थँक्स् का ? याबद्दल फीस्ट देणार ना? "
" अं — — घरी याल, संध्याकाळी — — ?
" पण — — ?"
" नाही — — घरी मी अन् मम्मीच असतो ! —"
" अन — — तुमचे डॅडी ?"
डॅडींच्या आठवणीने वेदनेची एक कळ शरीरातून उठून गेली. डोळ्यांच्या काजळ कडा केव्हाच पाण्याने तरारून आल्या. — —
" सॉरी ! मिस् दीपा, मला तुम्हाला दुखवायचं नव्हतं

' डॅडी जाऊन फक्त एक वर्ष झालं होतं— — तो दिवस आठवतो. डॅडी पायलट होते — — त्याना घेण्यासाठी मी अन् मम्मी दोघीही विमानतळावर गेलो होतो — — अन पेट्रोलचा भडका उडाला — — संपूर्ण विमानाने पेट घेतला — — दुसऱ्या क्षणी काय होतय कळण्याआधी विमाचे तुकडे तुकडे झाले — — डॅडींचे शेवटचे दर्शनसुद्धा घेवू शकले नाही रे मी ... किती यातना झाल्या असतील त्याना मम्मी वेडी बना-यची तेवढीच शिल्लक राहिली होती — नियतीच्या एका फटक्याने तिचं जीवन कोमेजून गेलं — — अजून देखील — आठवणींची फुलवात लावून ती देवघरात बसलेली असते — — —
"दीपा ! दीपा ! माझ्याकडे बघ ! तुझ्या दुःखावरील खपली काढायची नव्हती मला - — तुझी सारी दुःखं ही माझी दुःखं आहेत — — तुझ्या दुःखात मीही सह-भागी आहे ना ? "

अमोलच्या हळुवार शब्दांनी मी भानावर आले — — दूरवर एका गीताच्या ओळी ऐकू येत होत्या —
" शब्दरूप आले मुक्या भावनांना !" — — —
या गीतातला प्रत्येक शब्द हृदयातल्या कोंदणात जपून ठेवावा - - - अस वाटायला लागलं - - - कसलाही मागचा पुढचा विचार न करता त्याने जवळ घेतलं ... पाठीवरून हात फिरवीत राहिला - - - स्पर्शानेही दिलासा देत राहिला - - - शब्दावाचून स्पर्शच बोलत होता - - त्याच्या हातामध्ये गुंफलेले हात मी काढून घेतले. - - - - संध्याकाळी तो घरी आला - - - मम्मी-बरोबर कितीतरी गप्पा मारल्या त्याने डॅडींची थोडी-सुद्धा आठवण येऊ दिली नाही - - - डॅडी गेल्यानंतर मम्मीच्या चेहऱ्यावरील हसू पाहून अमोलसाठी काय - - - अन् काय नको ! अस होऊन गेलं - - - क्षणभर वाटलं - - - आकाशात सूर मारावा अन् चांदण्यांची फुले कुस्करून आणावीत - - - आपल्या अमोलसाठी - -

अमोल ! अमोल ! अमोल !
अशाच कळत - - नकळत घडणाऱ्या प्रसंगातून - - - कधी आम्ही एकमेकाचे झालो — - समजलंच नाही - हां हां म्हणता — — आमची मने कल्पनांचे पंख लावून — — स्वप्नांच्या साम्राज्यात संचार करू लागली — — — — !
त्याच्या स्पर्शात मी माझ्या वेदना विसरून जात

होते – – काही वेळेला मन विचारामध्ये भरकटत राहायचे .. शंका - कुशंकांनी मन स्वतःला पोखरीत रहायचं – – खरंच हे घडतय ठीक नाही हे समजत होतं. पण मनाला कशी आवरू ? – – सारखं – – – काही तरी हरवल्यासारखं – – हरवल्यासारखी अवस्था – – खरच ! कुणीतरी प्रेम करतय – – ही कल्पना किती सुखावह आहे – – फूल सुकून गेल्यानंतर वास दरवळण्या इतकी – –

अन् – –

"मागते मन एक काही – – दैव दुसरे घडवते" – – यातील सत्य प्रत्यंतरास आणणारा तो दिवस – –

त्या दिवशी माझा वाढदिवस होता – – – अमोलने मम्मीसह महाबळेश्वरला जायचा प्लॅन आखला – – डॅडी गेल्यापासून मम्मीनं कुठल्याच कार्यक्रमात भाग घेतला नव्हता – – त्यामुळे मम्मीच्या होकाराने मीसुद्धा त्याच्या होमध्ये हो मिसळला - -

'महाबळेश्वर' – – चारी बाजूनी बिलगलेल्या घनदाट झाडीमध्ये – – कड्यामधून फेसाळणाऱ्या जलधाराच्या तुषारामध्ये – – विरळ – – विरळ सूर्यकिरणांशी लपंडाव खेळणाऱ्या धुक्यामध्ये - - - मन कस बेभान होऊन गेलं – – अमोलच्या सहवासाने – – त्याच्या मृदूतेने – – त्याच्या तारूण्याने त्या धुंदफुंद वातावरणामध्ये ––मी अंतर्बाह्य बदलून गेले होते – – मन आनंदाच्या हिंदोळ्यावर डुलत होते - - साऱ्या निसर्गालाच जणु भरतीच उधान आलं होतं - - अचानक सांज कधी दाटून आली – – समजलंच नाही – – आम्हीही त्या धुंद वातावरणाला निरोप दिला – – गाडीमध्ये संगीताच्या धुनमुळे मन कसं फुलून गेलं होतं – अन् डोळ्यापुढे रंगीबेरंगी स्वप्ने दिसत होती

– – डोळ्यापुढे एकदम पडलेल्या प्रकाशाने डोळे दिपून गेले - - क्षणार्धात मला एक जोराचा धक्का बसला – – अंधार – – अंधार माझ्या जाणीवा हर-पल्या – – !

अन् आज – –

अमोल एक अश्रू तुझ्या डोळ्यातला – – पुसून गेला आयुष्याला - - हं आयुष्य ! - - का अमोल ? - - गेलास ना रे दूर - - दूर - - अरे ! मी कोणतही नात घेवून जगले असते रे तुझ्यासाठी -- नाही - - – – – मी मजनूविना लैला बनलेय रे – – तुझी अर्ध-वट स्वप्ने कपाळावर चिकटवून फिरत राहणार आहे - - एकटीच हेच आयुष्य ?

जीवनाच्या पर्णकुटीत मनाच्या अंगणात सोनेरी पावले उमटवून जाणाऱ्या कांचनमृगासाठी वेड्या झालेल्या सीतेसारखी माझी अवस्था झालीय रे - – ! अमोल ! पण कांचनमृग हाती न येणे - - स्वतःला हरवून बसणं - - हीच प्रीतीच्या नंदनवनाची सांगता असते काय रे ? - - असेल तर - - तुझ्या आठवणी बकुळीसारख्या माझ्या मनात दरवळत राहतील - - - अखेर निर्माल्य होऊनच जगणं हेच का रे आयुष्य ? - - शेवटी - - शेवटी - - प्रितिरूपी मोती हातात न राहता - - आठवणीचा शिंपला राहिला तरी चालेल रे - - त्या शिंपल्यात एकच नाव कोरेन - - - "अमोल"

●●

# एकटा

**के. एम. गाडे**
बी. ए. भाग १

... ये ... उभी राहू नकोस ! बैस त्या खुर्चीवर. हां हां ... शिस्तीने बैस. अशी शांत का ? किती दिव–सांनी भेटते आहेस नाही ! तासभर इथे बसशील आणि जाशील तू दुसऱ्यानं निर्माण केलेल्या वाटेवरची वाट चालण्यासाठी पण आता ती तुझीच आहे ना – ! आता भेट होऊन तरी काय उपयोग ? – तू गेलेलीच आहेस आणि मी एकटाच त्या आठवणींचा आधार घेऊन जीवनाच्या अंथरूणावर लोळत आहे अन् घड-लेल्या गोष्टी माझी सोबत करत आहेत राहू देत... तू का आलीस ?

"फार दिवस भेट नाही म्हणून भेटण्यासाठी ?"
"मग झाली ना .. भेट. छान पण अशी गप्प बसू नकोस हं ..."

"बोल ... कसा चाललाय तुझा संसार ?"
"अगदी छान चाललाय ? खूप सुखी आहेस ना तू ?"
"आणि ... मी ? तू नसलीस तरी त्या आठवणी मला सोडतच नाहीत; आणि सर्व काही आठवत ही वाट चालतो आहे मात्र आहे एकटाच !"

... "अशीच एक धुंद संध्याकाळ होती. पश्चिमेच्या गालावरील रक्तिम्याचा पुरेपूर आस्वाद घेण्यासाठी सूर्यदेव तिच्या मिठीत हळुहळू जात होता. आणि इकडे पूर्व क्षितीजावर चंद्राच्या आगमनासाठी कितीतरी तारका अगदी इमानाने आपले कर्तव्य बजावत होत्या. त्यामध्येच एक चांदणी अगदी तेजस्वी होती. छान दिसत होती. किती खुलली होती ... पक्षी इकडे - तिकडे विहरल्यानंतर घरची धाव घेत होते. रोजच्या मळलेल्या वाटेवरून शेतकरी स्वतःची गुरे घेऊन घरची वाट चालत होते. अशा धुंद वेळी एका उंच टेकडीवर अगदी शांत ठिकाणी आपण दोघे जाऊन बसलो होतो. आठवतो तो दिवस तुला ? त्यावेळी तू किती खुलली होतीस, ते निसर्गाचे रंगकौशल्य पाहून तू किती आनंदली होतीस. मी जवळ आहे याचे . भान देखील तुला नव्हते. तोवर कुणीतरी एका पक्ष्याला दगड मारून घायाळ केले. तुझ्या आनंदाचा विरस झाला. माझे हात तुझ्या हातात घेऊन ते तुझ्या डोळ्यांशी लावलेस. तुझ्या डोळ्यात अश्रू होते. तू खूप हळवी हं साध्या त्या पक्ष्याच्या विव्हळण्यान तुझं मन रडू लागलं. . तुझी ती अवस्था पाहून मी किती दुःखी झालो होतो ...

... जाऊ द्या ... तू हळवी होतीस फक्त तुझ्या दुःखासाठीच ! तू माझी आहेस, माझं दुःख तुला सांगावं म्हणून कितीकदा धडपडलो पण...पण तूच स्वतःची दुःखं सांगायचीस आणि डोळे पुसायचीस पण माझं

दुःख तू देखील कधी ऐकले नाहीस. मन तुझं हलकं करत होतीस. माझ्या जवळ पण माझं मन तू कधीच हलकं नाही केलस. मी अजूनी दुःखी आहे ग ! मला खूप सांगायचं होतं तुला ... पण तू माझी असतानासुध्दा सांगायला मी कचरलो ! कारण, माणूस फक्त स्वतःचे दुःख सांगण्याचा प्रयत्न करतो ... पण दुसऱ्याचे दुःख तो कधीच जाणू शकत नाही किंवा ते जाणून घेण्याचा प्रयत्नही करत नाही तेच तू केलंस. तुला दोष देण्यात काय अर्थ ? प्रत्येकजणच स्वार्थी असतो नाही का ? तुझे दुःख मला सांगून तू तुझा स्वार्थ साधलास पण मी ... मी अजूनहि एकटाच आहे ग ! दुःख कोणाला सांगायचे ? अन् ते ऐकून कोण घेणार ? प्रत्येक जण स्वतःची जागा घेऊन बसलेला आहे आणि तो दुसऱ्याचीही अडचण करतो आहे आणि त्याच धुमाळीत मी मरतो आहे. तुझ्या हृदयात मला थोडीशी जरी जागा दिली असतीस तर ? छे .. कल्पना करून त्याचे कधी रूपांतर सत्यात झालंय का ? नुसती खुळी आशाच नाही कां ? तुझ्या मनांत मी होतो असे ज्यावेळी तू मला सांगितलंस तेंव्हा वाटलं, मला हिच्या हृदयात जागा मिळाली नाही पण मनांत जागा मिळाली आणि ती तू मला दिलीस हे काय थोडं झालं ? खूप समाधानी होतो. तहानलेल्या माणसाला एक घोट पाणी मिळाले तरी त्याच्या चेहऱ्यावर किती उत्साह येतो नाही ! तसाच होतो मी आणि माझे जीवन !

तू मला तुझ्या मनात जागा दिलीस, मी तुझी मूर्ति माझ्या हृदयात पुजत होतो. पण नाही, देवळातल्या दगडी मूर्तीला सजीवपणा आणण्याचा तो निष्फळ प्रयत्न ठरला. पण तू अस का केलंस ? याचं उत्तर नाही तुझ्याजवळ ! पण माझ्याजवळ आहे ना .. ! ! सर्वच स्त्रियांना पैसा, ऐश्वर्य याची लालसा मग तू ह्यांचीच एक जात ... पैसा .. माझ्याजवळ नव्हता, तो छानछोकीपणा माझ्याजवळ नव्हता ... आणि तेच तुला आवडत होते. श्रीमंता घरची लेक तू .. तुला तेच आवडणार ! तुला पैसेवान हवा होता– तर माझ्या सारख्या एका गरीबाशी प्रेमाचे नाते कशाला निर्माण केलेस ? कशाला मला प्रेमाचे शब्द ऐकवत होतीस ? कशाला खोटा नाच नाचलीस ... मी तुझा कोणता गुन्हा केला होता की तू माझ्याशी निष्ठूर झालीस. सतत श्रीमंतीत लोळणाऱ्यांना गरीबाच्या झोपडीतील जीवनाची काय पर्वा म्हणा ! त्यांना वाटते जग .. आपल्यासारखेच .. आहे.

आजपर्यंत ऐकत होतो मुलगी मुलांकडून फसविली पण जातो. या नियमाला तू मात्र काळीमा फासलास ! वा : ! धन्यता वाटली असेल नाही तुला ? मला तू जन्मातून जरी उठवलं असतस तरी मी रागावलो नसतो तुझ्यावर ... कधीच नसतो रागावलो पण तू यःकश्चित पैशासाठीच– मला दूर लोटलस – ...... पण का ? याचे उत्तर आहे तुझ्याजवळ . ? बोल तुला काय बोलायचे आहे ? आता तू इथे का आलीस ? असं लग्न झालेल्या श्रीमंत आणि त्यात म्हणजे सुशिक्षित स्त्रियांनी पुरुष हा एकटाच असताना घरात घुसू नये हे तुला माहित आहे ना ?

परत 'हो,' म्हणतेस ! याची कल्पना असताना सुद्धा इथं आलीस ? आता कोणतं दुःख देणार आहेस की ज्यामुळे या पामराला अजून ठेच लागायची आहे ? आल्या पावली परत जा ..

मी कुठे जाऊ म्हणतेस ?

ज्या ठिकाणी, ' माझं प्रेम तुझ्यावर आहे' असं मोठ्या तोंडाने सांगितलस, ज्या ठिकाणी तुझं दुःख मला सांगून, माझ्यासारख्या माणसाचं हृदय विरघळायला लावलंस, तेथेच तू हे शब्द बोलतेस ? जा ... मला सोडून जातानाच तू कुठं जायचं याचा विचार केलेला होतास. तेथेच परत जा ......

"तुला काहीतरी सांगायचय् म्हणतीस?" सांग आजपर्यंत तू माझं ऐकलच नाहीस, पण मी ऐकून घेतले आहे. सांग - - ऐकण्याची इतकी सवय झालीय मला की, कोणाला काही सांगावे, असे वाटतच नाही मुळी – ! बोल अशी विमनस्क होऊन परत माझ्या

डोळ्यांत पाहू नकोस. तुझे डोळे मला परत तुझाच विचार करावयाला लावतील — हं.. हो . बोल ...

"भीती वाटतेय ? "

"हं भीती कसली ... तुझं दुःख सांगताना भीती कसली ? उलट मला माझे दुःख सांगताना खूप भीती वाटते – पण कोणी ऐकूनच घेत नाही. जो तो स्वतःच्याच विचारात गर्क.

... असो माझे जीवनच असे आहे .... तुला .. तुला माहित आहे जीवन म्हणजे काय ते ! दुसऱ्याच्या मनाचा जो विचार करतो ना त्यालाच जीवन म्हणजे काय ते समजते आणि जर नाही समजले तरी ते कशात आहे याचा शोध घेत घेत तो जगातून पार नाहीसा होतो. बोल इतकी माझ्याजवळ होतीस पण मला तू ओळखलं नाहीस ... जाणलं नाहीस. सर्वजण माझे म्हणून सर्वांना कवटाळण्याचा प्रयत्न केला पण खरच सांगतो अंगाला काटेच फार लागले. कळ सहन होत नाही. पण सांगू कुणाला ? कांही म्हण मला सतत तुझीच आठवण होते ... कां हे मला अजूनही नाही समजलं ! अरे हो ... मी मीच बोलत बसलोय ... तू कांहीतरी सांगणार होतीस ना सांग ... पण जरा तो पेला देतेस – .. छान ! कसं थंडगार पाणी आहे. नाही ? या पाण्यालासुद्धा माहीत नाही आपण थंड कसे झालो ते ! बिचारं काय करणार, शेवटी ते पाणीच ... शेवटी त्याला थारा पोटातच नाहीतर गटारात ! ! ... हं बोल आता ...

काय ? मीच बोलू ? मी छान बोलतो ? छान ! अग – अनुभव आले म्हणजे कळेल तुला बाहेरून छान दिसणाऱ्यांना त्यांच्या आंतील खळबळ कुठे ठाऊक असते ... ? जीवनाची वाट चालताना तुझी न् माझी भेट झाली. भेटीनंतर पक्की ओळख अन् त्यातून नवे प्रेमसंबंध निर्माण झाले. खूप - - खूप बोललो - - लग्नानंतर संसार कसा करायचा आणि तोही तुझ्या परीने तो तुझाच कसा असेल, याचा विचार तूच केलास, तुझी दुःखं त्यात सामावण्याचा प्रयत्न केलास – – आणि – – मी – – फक्त ऐकतच होतो – – – हे ऐकतानाच तू अचानक एका भुंग्याच्या पंखावर बसून तरंगू लागलीस अन् मी एकटाच राहिलो. अजूनहि एकटाच जगतोय – –"

"मी लग्न का केलं नाही ?"

एक लक्षात ठेव – – मागील आठवणीत पुरुष सतत बुडलेला असतो आणि स्त्री – – स्त्री नवा साथीदार मिळाला, की स्वतःचा संसार गोड करण्यासाठी त्या आठवणींची फोडणी देते अन् पदराला हात पुसून जगात वावरते नाही का – – ? तू गेलीस-तिथंच माझं जीबन संपलं – – पण जीव मला सोडत नाही. म्हणून जगतोय – – अगदी एकटाच – – "

तूं कांही सांगणार असशील तर सांग, नाहीतर जा अगोदर येथून – – मी एकटाच आहे, मला एकटंच राहिलं पाहिजे. मला कोणाची सोबत नकोय् – – ही जीवनाची वाटचालतांना मी एकटाच चालेन, मेलोतरी एकटाच जगणार आहे – – पण तू – – जा सुखाचा संसार कर – – – आणि हे बघ हे सर्व कुणालाच सांगू नकोस, त्याआठवणींनासुद्धा एकटेच राहूदे राहावलं नाही तर त्या आठवणींना माझ्याकडे पाठवून दे, त्यांना मी या हृदयांत सामावून घेईन आणि परत चालत राहीन – मात्र – – – एकटाच – – आजपर्यंत चालत आलो तसा – – – !

●●

# डॉ. आंबेडकरांचा राष्ट्रधर्म

**रूद्रगोंडा आपया पाटील**
बी. ए. भाग ३

डॉ. आंबेडकर दलित वर्गाचे श्रेष्ठ पुढारी असल्याचे म्हटले जाते. खरे म्हणजे ते संपूर्ण राष्ट्राचे श्रेष्ठ पुढारी होते. ते प्रसिद्ध कायदेपंडित, घटनातज्ञ, राजकारणधुरंदर, दलितांचे उद्धारकर्ते आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून संबोधले जातात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे घराणे रत्नागिरी जिल्हयातील होते. त्यांचा जन्म महू येथे एका गरीब व दुर्देवी अशा अस्पृश्य घराण्यात झाला. त्यांचे वडील लष्करी शाळेत शिक्षक म्हणून नोकरी करीत होते. लहानपणीच त्यांची आई वारली असल्यामुळे विशेष असे मातृप्रेम त्यांना लाभले नाही. डॉ. आंबेडकरांचे शिक्षण दापोली व सातारा या दोन्ही ठिकाणी झाले. इ. स. १९०७ साली ते मॅट्रीकची परीक्षा पास झाले. जुन्या रूढी परंपरेमुळे त्यांचा याचवेळी विवाह घडून आला आणि ते इ. स. १९१३ साली बी. ए. ची परीक्षा पास झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य मोठे आहे. लिखाण चिंतनपर आहे आणि संशोधनही महत्वाचे आहे. सर्वसाधारण वेद वगैरे प्राचीन साहित्य, ब्राम्हण मंडळींचे असून त्यांनी आपल्या मक्तेदारीसाठी निर्माण केले आहे, असे मानले जाते. याविरूद्ध डॉ. बाबासाहेबांनी आपले निर्णायक मत असे मांडले होते, की वेदसाहित्य हे सर्वांचेच आहे. आणि त्यामध्ये ब्राम्हण, क्षत्रीय, वैश्य, व शुद्र या सर्वांचाच सहभाग आहे. 'गायत्री' हा सर्वश्रेष्ठ मंत्र ब्राम्हणांचा असे मानिले जाते. पण प्रत्यक्षात हा मंत्र एका अ–ब्राम्हणाने केलेला आहे. ही गोष्ट लक्षात आणून देण्याचे महत्वाचे कार्यही त्यांनी केलेले आढळून येते.

मानवी समाजातील अस्पृश्यतेच्या संदर्भात डॉ. बाबासाहेबांनी हिंदू धर्मावरच कडाडून टीका केलेली आहे. परंतु जेथे राष्ट्रीयत्वाचा प्रश्न उपस्थित होतो तेथे विशुद्ध राष्ट्रीयत्वासंबंधीची त्यांची भूमिका स्पष्ट असलेली आढळून येते. ५ फेब्रुवारी १९५० रोजी घटनासमितीसमोर आपल्या भाषणात त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, अनेक शतकानंतर आपल्याला स्वातंत्र्य मिळालेले आहे, गुलामगिरीतुन आपली कायमची सुटका झालेली आहे. इतक्या वर्षानंतर आणि इतक्या कठोर परिश्रमानंतर मिळालेले स्वातंत्र्य हातचे जाऊ नये म्हणून कोणत्याहि कारणास्तव आपल्यात मतभेद निर्माण होऊनयेत याची प्रत्येक भारतीय नागरिकांने दक्षता घेतली पाहिजे मतभेद असतील पण त्या मतभेदांचे खंडन करणे आवश्यक आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदूधर्म समाजा –

तील उच्चनीचता, जाति व्यवस्था आणि वर्गीय व्यवस्था यांचा सखोल स्वरूपात अभ्यास करून हिंदूधर्म हा अस्पृश्यांना हीन कसा लेखतो हे त्यांनी उत्तम प्रकारे स्पष्ट करण्याचा महत्वाचा असा प्रयत्न केलेला आहे. अस्पृश्यता आणि हिंदुधर्म यांच्याविरूद्ध लढा देऊन अस्पृश्य समाजाला समता, बंधुत्व, न्याय आणि स्वातंत्र्य मिळवून दिले. २० मार्च १९२७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कुलाबा जिल्हयातील महाड येथील चवदार तळयावर हजारो जनसमुदायाच्या उपस्थितीत सामाजिक समतेसाठी सत्याग्रह केला. लोकांनी निरनिराळी प्रलोभने दाखवली असतांना देखील त्यांनी बौद्ध धर्माचाच स्वीकार १९५६ मध्ये केला. लहानपणापासून त्यांच्या मनात जीझस ख्राईस्ट आणि भगवान बुद्ध यांच्या विषयी आपुलकीची, आत्मीयतेची भावना होती. बौद्ध धर्म स्वीकारण्यामागे त्यांचा मोठा उदात्त हेतू होता. तो म्हणजे आपल्या दलित समाजाचे 'डी–नॅशनलायझेशन' होऊ नये. ऐतिहासिक दृष्टिकोनातून विचार केल्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतात फार मोठे समाजपरिवर्तन घडवून आणल्याचे आढळून येते. त्यांनी अस्पृश्य समाजाला नवीन तत्वज्ञान व नवीन विचार प्राप्त करून देऊन त्यांचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न केला. या डॉ. बाबासाहेबांच्या राष्ट्रधर्माविषयी, धनंजय कीर असे म्हणतात की, या युगातील पहिल्या श्रेणीतील अलौकिक पुरूषांमध्ये डॉ. आंबेडकरांचे स्थान आहे. आजवर जगात पददलितांचे रक्षणकर्ते व दलितांचे कैवारी आणि मानवी स्वातंत्र्याचे शिल्पकार होऊन गेले, त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नांव मोठ्या आदराने घ्यावे लागते. अशा या महापुरूषांच्या चरणी मी माझी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

●●

मानसिक स्वातंत्र्य हेच खरे स्वातंत्र्य आहे. ज्याचे मन स्वतंत्र नाही तो मोकळा असून गुलाम आहे. ज्याचे मन स्वतंत्र नाही तो जिवंत असून मेला आहे. मनाचे स्वातंत्र्य ही जिवंतपणाची साक्ष आहे. जो आपली बुद्धी जागृत ठेवून, आपले हक्क काय, आपले अधिकार काय आपले कर्तव्य काय याची जाणीव करून घेतो त्याला मी स्वतंत्र म्हणतो. जो परिस्थितीचा, दास झाला नाही, जो परिस्थितीला आपल्या कह्यात आणण्यास सिद्ध असतो तो माणूस स्वतंत्र आहे, असे मी म्हणतो. जो रूढींच्या स्वाधीन झाला नाही, जो गतानुगतिक झाला नाही, ज्याच्या विचारांची ज्योत विझली नाही तो स्वतंत्र आहे असे मी म्हणतो. जो पराधीन झाला नाही, जो दुसऱ्यांच्या शिकवणीने वागत नाही, जो कार्यकारण ध्यानात घेतल्याशिवाय कशावर विश्वास ठेवीत नाही, जो हक्कांचा अपहार केला असता त्यांच्या रक्षणार्थ दक्ष असतो, जो प्रतिकूल लोकमताला घाबरून जात नाही, दुसऱ्याच्या हातचे बाहुले न होण्याइतकी बुद्धी व स्वाभिमान ज्याला आहे तोच माणूस स्वतंत्र आहे असे मी समजतो.

– डॉ. बाबासाहेब आंबेडकर

●●

# ऐतिहासिक पत्र

**महादेव पाटील**
बी. ए. भाग ३

"तिकिट खिडकी उघडताच बहोत खंदळा खंदळी जाहली. ये समयी मागचे पुढे, पुढचे मागे ऐसा बहोत प्रकार जाहला. तिकिट खिडक्या दिसेनाशा जाहल्या नॅरो पॅन्टवाल्यानी बहोत उच्छाद मांडला बाणांची खैरात जाहली धक्के देणारे रोडमल्ल पुढे जाहले. डुक्कर खळीस येतो तैसे प्रकार जाहला. पोलिसांच्या लाठी प्रहारे अगणित लायनरांची डोकीं फुटली. आम्हीही पराक्रमाची शर्थ केली. परी तीनदा मागे फेकिले गेलो. आकाशच फाटले, तेथे ठिगळ कोठे लावावे. ?"

विषय :– नॅरो पॅन्टवाल्यांच्या खंदळा खंदळीत डोकी फुटतात याची बखर !

स्थळ :– सुभाष चित्रमंदीर

वेळ :– दुपारी २॥ वा.

महादेव पाटील यांचेकडून.

श्री विविध व्यसन संपन्न पिक्चर भक्त, अखंडीत सर्वमान्य मनी राजेश्री रसिकराज, गडहिंग्लज नगर यासी, मित्रवर्य किशोर यांचे विनंती विज्ञापन ऐसाजे – बहोत समय जाहला म्हणोन हा खलिता राजेश्री प्रकाश याजकडून धाडीला असे आज रविवार नवीन पिक्चराचे थिअटरी आगमन जाहले. मनी संतोष जाहला. आम्ही पावणे तीन वाजता थिअटर समीप जातीने हाजीर जाहलो. तो इथे गर्दी अमाप दिसोन आली. नारायणराव पेशव्याना मारल्या समयी गारधांनी अशीच गर्दी केली; न जाणो बूटपाटलूनवाले धोतरवाले, नॅरोपॅन्टवाले, बेल बॉटम्‌वाले, टोपीवाले हाजिर होते. नॉयलॉनवाली, स्कर्टवाली, टेरिन, टेरिकॉटवाली, हेमामालिनीसारखे केसवाली तैसेचि नऊवारीवाली, पांचवारीवाली आदी वरकुड खानदानी बायकांची तोबा गर्दी दिसोन आली.

तिकिट खिडकी उघडताच बहोत खंदळा खंदळी जाहली. ये समयी मागचे पुढे, पुढचे मागे ऐसा बहोत प्रकार जाहला. तिकिट खिडक्या दिसेनाशा जाहल्या नॅरोपॅन्टवाल्यानी बहोत उच्छाद मांडला. बाणांची खैरात जाहली. धक्के देणारे रोडमल्ल पुढे जाहले. डुक्कर खळीस येतो तैसा प्रकार जाहला. पोलिसांच्या लाठी प्रहारे अगणित लायनरांची डोकी फुटली. आम्हीहि पराक्रमाची शर्थ केली. तरी तीनदा मागे फेकिले गेलो. आकाशच फाटले तिथे ठिगळ कोठे लावावे ? माघार घेणे क्रमप्राप्त जाहले. जितेंद्र सारख्या केसवालियांचे केस विस्कटले, कुणाची टोपी गयाब जाहली, कुणाचा साथ आणिलेला ऐवज लुटला गेला. कुणाच्या थोबाडाचा रंग पुसला गेला. तर कुणी दुसऱ्याचे थोबाड रंगवले. तरीही बाणांसारिखे वरकड यंत्रे सुटतच होती. दशदिशा धुंद जाहल्या. लढाईची धुमश्चक्री उडाली.

सुऱ्या आघाडीला होता. जखमी सुऱ्या लेकाऱ्याला पोलिसानी पकडिले, पुसते जाहले, "ऐसा प्रकार पुन्हा– करशील ?" ते समयी त्याने उत्तर केले, "पोलिस पखर दिगार बचेंगे तो और भी लढेंगे !" पूर्वी युद्धात अतिरथी. महारथी झुंजत त्याप्रमाणे सुऱ्याने वीरश्रीपणाची शर्थ केली. पुढे त्याची गत काय जाहली न कळे ? गायब जाहले, तुरूंगात गेले, शत्रू समवेत हॉटेलात गेले. हे इस्वरी कौतुक ब्रह्मादिकास नकळे ते आम्हास काय कळे ? ईश्वरेच्छा बलियांसी ! दुसरे काय ! असो, ये समयी आकाशी देवादिकांची दाटी जाहली, महा– भारती कौरव – पांडव लढले, पानिपती मराठे–गिलचे लढले तैसी खणाखणी जाहली. आम्ही एक बिचारे मागुती राहिलो. आपण कालचक्रासही फिरवावयास समर्थ आपण न याल तो आमची इज्जत वाचणार नाही थिअटरहून आम्ही विन्मुख जावे काय ? ते शक्य होणे नाही. तुम्ही आम्ही सरळ एकाच माळेचे मणी आहोत. नाइकाल तर तुम्हीच कष्टी व्हाल. पिक्चर वैराग्य उतारवयी कराल ते थोडेच. मनी धराल ते होते. तरी त्वराकरावी. काळाबाजारवाले बहोत दिसतात. पहिला भाव राहिला नाही. आम्ही तो कर्जदारांचे नरकात बुडालो, जो जो राजकारणे करितो तो तो काम नासतो, जादा कुमक घेवोन यावे, संगती खजिना आणावा.

बहोत काय लिहिणे, कृपा केली पाहिजे ! ह विज्ञाप्ती मर्यादेयं विराजते !

कळावे,

आपला स्नेहसंपन्न स्नेहांकित

महादेव पाटील.

●●

"ठुंबरी ओळखण्याची मुख्य खूण म्हणजे 'संया' व 'गुया' या शब्दांची विपुलता होय. तिच्यातील विषय बहुतकरून 'माझी सासू खराब आहे, नणंद हट्टी आहे, अशा तऱ्हेचे किंवा 'यमुनातिरी मी जात असता माझी घागर फोडली' अशा आशयाचे गाऱ्हाणे असते, आजपर्यंत हिंदुस्तानात अनेक प्राचिन व अर्वाचिन गवई झाले पण गाण्यात सासूचा व नणंदेचा द्वाडपणा पूर्वी होता तसाच सर्वव्यापी अजून चालू आहे व घागरी फोडण्याचा क्रम यमुनातटस्थ चटोरांनी अजून सोडिला नाही हे त्यास लांच्छनास्पद आहे.

श्री. कृ. कोल्हटकर – "सुदाम्याचे पोहे"

# ‘ वास्तवातील खेडे व साहित्यातील खेडे ’

## परिसंवाद, [ संकलन ] बार्शी साहित्य संमेलन

कु. मंगला द. बद्री
बी. ए. भाग ३

बार्शी साहित्य संमेलनात रंगलेल्या काही चर्चा–सत्रात ग्रामीण साहित्यचर्चेचा समावेश करावा लागेल. कोल्हापूरच्या डॉ. गो. मा. पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या चर्चेचा विषय 'खेडे' वास्तवातील आणि साहित्यातील असा होता. ग्रामीण साहित्यात मोलाची भर घालणाऱ्या साहित्यिकांनी चर्चेत भाग घेतला होता.

मराठीमध्ये ग्रामिण कथा लिहिण्यास सुरवात होऊन आज जवळ जवळ ३०–३५ वर्षे झाली आहेत. कलेच्या दृष्टीने तो खास वेगळा प्रकार नाही. मानवी अनुभूती सर्वत्र सारखी असली तरी खेडयातली जीव–नाची अनुभूती ही नागरी जीवनापेक्षा वेगळी असल्या–मुळे ग्रामीण कथा वेगळया वैशिष्टयाने उठून दिसते.

वाचकांच्या दृष्टीनेही ग्रामीण कथा एक रूचि–पालट म्हणून लोकप्रिय झाली. सदाशिवांठी कथा वाचणाऱ्या शहरी वाचकाला ग्रामीण कथा नाविन्यपूर्ण वाटू लागल्यामुळे नियतकालिकांनीही तशा कथा माग–वायला आणि लेखकांनीही मागणी पुरवायला झपा–टयाने सुरूवात केली. या मागणी – पुरवठयात ग्रामीण कथेचा कस कमी झाला. तसेच या साहित्यात कथांची संख्या मोठी दिसत असली तरी कादंबरी, नाटक यांचे प्रमाण कमी आहे. कथेला लैंगिकता, विनोद यांचा मुलामा अधिक प्रमाणात दिला जाऊन ती रंजित व आटोपशीर लिहिण्याचे प्रमाण अधिक होऊ लागले.

प्रा. द. ता. भोसले यांनी प्रस्तावनेत १९६० नंतर खेडयांत झालेला बदल सांगितला. शिक्षण, यंत्र–संस्कृती, शेतीतील सुधारणा यांचा परिणाम खेडयावर झाला असल्यामुळे खेडयांचा तोंडावळा शहरासारखा दिसू लागला आहे. नोकरीच्या ओढीतून शेतीकडे दुर्लक्ष करून तरूण शहरांकडेच धावताहेत. त्यांच्या मते होणारा बदल हा तसा वरवरचा आहे. अजूनही खेडयात भूक, दारिद्रय, अज्ञान, पिळवणूक कायमच आहेत. ह. ना. आपटे, माटे, दिघे, यांनी वास्तव साहित्यात आणून त्याला रोमँटिसिझमची जोड दिली. मिरासदार पाटील यांनी वरवरच्या बलावर अधिक भर दिला. खोटा–शृंगार, खोटी गाणी, शाब्दिक विनोद यात त्यांना दडपण्याचा प्रयत्न करून जन्मणारी कथा ही खरी ग्रामीण कथाच नाही.

डॉ. आनंद यादव यांनी ग्रामीण साहित्याला प्रतिष्ठेचे स्थान प्रथमच मिळते आहे याविषयी आनंद

व्यक्त केला. ह. ना. आपटयांनी ग्रामीण साहित्याला सुरूवात केली. अलीकडे याची वाढ अधिक झाली असली तरी या साहित्याची समीक्षा योग्य प्रकारे झालेली नाही. शहरात बसून केलेले खेडयाचे चित्रण वास्तव होणार नाही. त्याकरिता अनुभवाची गरज आहे व अनुभूतीने केलेलं लिखाण अंत:करणाला भिडते म्हणून ग्रामीण लेखकाने साहित्य जिवंत व्हावे असे वाटत असेल तर आपल्या 'वस्तीच्या घोंगडयाला' विसरू नये, असा सल्ला डॉ. यादवांनी दिला.

निपाणीचे महादेव मोरे हे ग्रामीण लेखक पिठाच्या गिरणीत काम करतात. त्यांनी स्त्रियावरील अत्याचार, विडी कामगारांचे हाल इ. बाबतीतील अनुभव सांगितले. नवी यंत्रसंस्कृति खेडयांत येत आहे· तेव्हा पूर्वीचे जीवनमान न रेखाटता सुधारणेचा होणारा परिणाम चित्रीत केला गेला पाहिजे. शिवाय नर्सेस, शिक्षिका, पाटील यांची प्रकरणेभडकपणे रंगवणाऱ्या कथा या वास्तव नाहीतच, असेही त्यांनी सांगितले.

प्रा. रा. रं. बोराडे यांचे भाषण अभ्यासपूर्ण झाले. ते स्वत: लेखक आहेत. त्यांनी १९६३ मध्ये कथा लेखनाला प्रारंभ केल्याचे सांगितले. संपादक ग्रामीण शृंगारिक, विनोदी कथांची मागणी करतात. तसेच खेडयातून नव्याने लिहिणाऱ्या लेखकांच्या अड–चणीही त्यांनी अभ्यासिल्या आहेत. दुसरा अनुभव असा सांगितला की, शहरी लेखक ग्रामीण अनुभवांना वंचित झाला आहे तर खेडयातील लेखकांना संपादक प्रकाशक भेटत नाहीत ! ही दूरावस्था दूर झाल्याखेरीज ग्रामीण साहित्य सुधारणार नाही.

कवी ना. धों. महानोर यांनी महत्वाचा पण न चर्चिलेला विषय मांडला तो म्हणजे ग्रामीण साहित्या-बरोबर काव्य, लोककथा, लोकगीते यांचाही अभ्यास केला पाहिजे. काव्य सौंदर्य टिपण्याची त्यांची दृष्टी उल्लेखनीय आहे. ग्रामीण कथेची पार्श्वभूमी सांगताना लेखक जुन्या कल्पनांना, समजुतींना चिकटून आहेत, असेही त्यांनी सांगितले. पाटील, शेतकरी ही कल्पना पूर्वीचीच आहे. ठराविक साच्यातून कथानिर्मिती होते, त्याकरिता शेतीतील सुधारणा, नीतीअनीती ही लक्षात घेतली पाहिजे. लेखकाने जियले लेखन केले असेल त्या मातीशी समरस झाले पाहिजे. तसेच काळा-च्या पुढे जाणारे लेखन योग्य ठरत नाही, असेही त्यांनी आवर्जुन सांगितले. विज्ञानाने बदललेले खेडे वाङ्मयात चित्रित होण्याची गरजही महानोरांनी बोलून दाख–विली. त्यांची कवी म्हणून अधिक प्रसिद्धी आहे. ग्रामीण कथेला मागणी वाढू लागल्यावर लिहिल्या गेलेल्या कथेचे वर्णन करताना त्यांनी एक कविताच म्हणून दाखविली व श्रोत्यांची मने जिंकून घेतली.

'खरा खरा खाजवीत  
गिरामिण कथा आली  
पचकन् थुंकताना  
मुरका मारून गेली.'

नंतर बाबुराव बागुल यांनीही कोणतंही साहित्य ग्रामीण नसतं, दलित नसतं तर ते फक्त साहित्य असतं. अभ्यासाच्या सोयीसाठी त्यांचे असे निरनिराळे भाग पाडले आहेत, असे विधान केले. तसेच ग्रामीण साहि–त्यातील आणखी एक उणीव म्हणजे स्त्रीचे चित्रण हवे तेवढे प्रभावी झालेले नाही, असे स्पष्ट मत बोलून दाखविले.

प्रा. शितोळेबाई लेखिका किंवा टीकाकार नाहीत तर एक वाचक म्हणून त्या बोलल्या. त्यादृष्टीने त्यांनी वाचकांची बाजू थोडक्यात मांडली. त्यांनी पहिला मुद्दा असा मांडला की, 'ग्रामीण भागात अंधश्रद्धा एवढी भयंकर आहे की; समाजाचे त्यामुळे फार मोठे नुकसान होते आहे. अंधश्रद्धेवर प्रकाश टाकण्यासाठी ग्रामीण साहित्य लिहिले जायला हवे. याकरिता त्यांनी शंकर–राव खरातांच्या 'धोंडाई देवरूषीण' या कथेचे उदाहरण दिले. तसेच कल्पनेतून वास्तवता रंगवू नका. भाषेच्या मुलाम्याने ग्रामीण साहित्य यशस्वी होणार नाही, असा इशाराही वाचक म्हणून त्यांनी दिला.

थोडक्यात या परिसंवादातून उत्कृष्ट साहित्य निर्मितींसाठी अनुभव, कळकळ यांची अत्यंत गरज आहे. पैसे मिळतात म्हणून भाव ठरवून लिहिणारे लेखक खरे प्रातिनिधिक लेखक होणार नाहीत. शिवाय ग्रामीण वाड्मय वाचकांसमोर येण्यासाठी बदलत्या जीवनाशी समरस होऊन लिहिणाऱ्या लेखकाला प्रका–शक भेटला पाहिजे, असे विविध मुद्दे मांडले गेले.

अशा तऱ्हेने ही चर्चा दोन अडीच तास रंगली त्यावेळी मुख्य मंडपात 'मराठी भाषा ही राज्यभाषा असावी कां ?' या विषयावर व्याख्यान असतानाही या छोटया मंडपात श्रोत्यांची खूपच गर्दी झाली होती. यावरून ग्रामीण साहित्याबद्दल लोकांच्या मनात अस–लेली ओढ दिसून येते.

○○

"कुलपासारखा रखवालदार त्रिभुवनात सापडणार नाही. त्याच्या पुढे पैशाची तिजोरी ओतली तरी त्याने दारास मारलेली मगरमिठी सुटावयाची नाही किंवा स्त्रियांच्या नेत्रकटाक्षांनी त्याचं लोखंडी हृदय विरघळावयाचं नाही. पहारा करताना त्याला डुलकी लागत नाही किंवा भूक – तहानेची बाधा होत नाही. त्याला उन्हाचा किंवा शीताचा त्रास होत नाही. लोहाराकडून त्याच्या हृदयावर प्रहार करून ते छिन्नभिन्न केले तर मात्र त्याचा नाइलाज होतो."

**श्री कृ. कोल्हटकर – "सुदाम्याचे पोहे"**

# बिजली

– गवळी ए. बी.
बी. ए. भाग २

संध्याकाळची वेळ. भिरभिरत जाणारा अवखळ वारा. त्याचेही डोळे कुणाच्यातरी शोधात असावेत. आपल्या सोबत आणलेला गारवा कुणालातरी बहाल करायचा असावा. तिच्या पावलात जसं वाढतं अंतर असायचं, जी ओढ असायची, तशीच त्याच्याही वाह–ण्यात घाई होती. अशावेळी फिरायला जायचं निमित्त करून ती रोज माझ्या दारावरून जात होती. आवेगानं चालणारी पावलं माझ्या दाराशी आल्यानंतरच तिचा पदर ढळत होता. त्याला सावरण्यासाठी ती उभी राहून वाऱ्यावर आरोप करीत ती स्वतःभोवतीच एक गिरकी घेत होती. त्याचवेळी तिची नजर माझ्या–कडं वळत होती. तिच्या मनात घुंगुरवाळे वाजत होते. मी मात्र निश्चल होतो. कारण मी मुळातच आक्रमक पविच्याचा माणूस नाही. शिवाय तिच्याविषयी मला ऐकून माहीत होतं, की ती कडाडणारी बिजली होती. अनेकांना तिच्याविषयी धास्ती वाटायची. तिच्याजवळ जाण्याचं धैर्य कुणात नव्हतं. तिच्या स्पर्शाविना ते जळत होते. मनातच झुरत होते. मला तसं झुरायचं नव्हतं. म्हणून मी शांत होतो सरोवरासारखा.

तिला पाहिलं, की तेवढ्यापुरताच मनाचा पृष्ठ–भाग हलत होता. कुठंतरी आवाज न करता बारीक लाट उठत होती, मध्येच विरत होती. तिला किनाराही सापडत नव्हता. अजून मनाचा तळ कांही ढवळून निघत नव्हता.

तिच्या रोजच्या वेषभूषेला आकर्षकपणा होता. कधी अस्मानी रंगाची साडी, त्याला मॅच असा ब्लाऊज व सुंदर बांगड्या, जणू अस्मानपरी खाली अवतरली. कधी गडद हिरवं जॉर्जेट नेसायची. सारं 'रान' हिरवंगार दिसायचं. हुरड्याला आलेलं टपोरं. रोजची तीच पण रूप मात्र वेगळं दिसायचं. आधीच तर ती सोनचाफ्यासारखी पिवळी. काहीही तिला शोभून दिसायचं. आणि दिवसातून एकदाच होणाऱ्या या दर्शनासाठी मी संध्याकाळी वाट पहात राहायचा. तेवढं दर्शन म्हणजे दुसऱ्या दिवसाच्या संध्याकाळपर्यंत–च्या विरहाच्या डोहातून तरून जायला नौका मिळायची.

एक दिवस अशीच नेहमीप्रमाणं फिरायला म्हणून ती बाहेर पडली. ती जाताना मी घरी नव्हतो. खरं म्हणजे यावेळी आवर्जून दारात उभा असायचा. तृषार्त नजरेनं तिच्या प्रतीक्षेत. पण त्या दिवशी घरचे सर्व लोक कागलला एका नातलगाच्या मुलीच्या लग्नाला जाणार होते. त्यांना पोहोचवण्यासाठीच मी स्टॅंडवर गेलो होतो. अचानक आकाशात ढग जमून आले. वादळ सुटलं. वळीव बरसायला सुरवात झाली. साथीला मेघांचा गडगडाट नि विजांचा कडकडाट अंगावर झेलीत मी घरी परतलो. वळचणीला पाहिलं तर ती उभी होती, ओलेती. त्या तेवढ्या अंधारातही तिला ओळखलं. कुलूप काढून दार उघडलं. ती कांही न

बोलता माझ्याबरोबर आत आली. दिवा लावला. नि तिचं अप्रतिम लावण्य नजरेत साठवीत भान हरपल्या-सारखा मी पाहात राहिलो. अशावेळी ही इथं कशी? हा प्रश्न मी स्वतःलाही केला नाही नि तिलाही. तहानलेल्या माणसानं पाणी घोटावं तसं तिला नजरेनं घटाघट पीत राहिलो. मी असा भांबावलेला बघून तिच म्हणाली, 'का आश्चर्य वाटतं का, मी यावेळी इथं कशी याचं? ........ नेहमीप्रमाणे फिरायला म्हणून बाहेर पडले नि अचानक पावसाला सुरवात झाली म्हणून इथं वळचणीला आसरा घेतला.'

'पावसाचं वातावरण बघून तरी बाहेर पडायचं भानावर येत मी म्हणालो.

'आभाळ दाटलं होतं पण एवढ्यात गळेलअसं वाटलं नाही. तसं म्हटलं तर उशीरच झाला. बऱ्याच दिवसांपूर्वीपासून आभाळ दाटलं होतं पण त्याला हुमका फुटत नव्हता.

एवढ्यात बाहेर एकदम वीज कडाडली. मेघाला आपल्या प्रेमाची कबुली देण्यासाठीच असावी. कारण त्यावेळी ती 'बिजली' या मेघाला घट्ट बिलगली होती. अंगातून पाणी निथळत असतानाही त्या बिजलीच्या धगीनं मी सुखावत होतो.

●●

" शिक्षण म्हणजे व्यक्तीच्या जीवनातील आणि राष्ट्राच्या जीवनातील चैतन्यदीप ! रत्नदीप ! ज्ञानाचा झगझगीत प्रकाश देणारा तेजोराशी प्रभाकर ! शिक्षण म्हणजे ज्ञानसागर ढवळून काढणारा सुवर्ण मेरू मंदार ! शिक्षण म्हणजे जीवन-भर पुरेल एवढे अमृत देणारा तुडुंब भरलेला कांचनाचा मनोहारी, मंगलमय कलश ! जीवनातील अज्ञानाच्या, निराशेच्या, व्यथेच्या नि वेदनेच्या काळोख्या रात्री, ज्ञानाचे शतसूर्य उजळण्याची शक्ती केवळ एका शिक्षणातच आहे."

○○

" सौंदर्य म्हणजे परमेश्वराचा साक्षात्कार ! जीवनाने जीवनाकडे, विशाल जीवनाकडे धावणे हा त्याचा स्वभाव. या मातीचा उद्धार करण्यासाठी जेव्हा जेव्हा अलौकिक परमशक्तीने येथे जन्म घेतले तेव्हा तेव्हा पृथ्वीवरच्या चिखल-मातीने त्यांचे पाय माखले. स्फटिक पात्रातून दीपशिखा जशी लखलखीत दिसते, ती दशदिशांत तेज फेकते चैतन्याची बरसात करते, आनंदाला उधाण आणते, अवघे विश्वच आपलेसे करण्यासाठी ती दीपकळी चमचमत्या तेजोराशींना प्रसविते, त्याप्रमाणे पुण्यात्म्यांच्या पार्थिव शरीरांतून अपार्थिवतेकडे त्यांची चाललेली धाव स्पष्टपणे दिसून येते."

–प्राचार्य बलवंत देशमुख.

●●



# क वि ता

## अनाम प्रियेस....

१

सखे, तुझ्यासाठी आज
शब्द ओठांवर आले
ओठ हालता हालता
मोगरीचे फूल झाले – – –

मोरपिसासम तुला
डोळाघडीत ठेवली
तुला बघून डोळचांत
झाली उन्हाची काहिली – – – !

○○

२

ओळ सजविली तेव्हा
फुले अंगणी केवडा
आणि फूल झाला म्हणे –
तुझ्या काखेतील घडा – – –

○○

३

तुझे पाहूनिया डोळे
फुटे वांझेलाही पान्हा
ओठ हळूच पिळता
तृप्त होईल ग तान्हा – – – !

○○

४

डोळे मिटताना थोडे
जप काजळाची धून
आता येईल चांदणे – – –
त्याचे मानू नको ऋण

तुझ्यासाठी उगवेल
माझ्या कातडीत चांद
त्याची खुडून पावले
त्याला पापणीत गोंद

अशा कातरवेळेला
नको माळूस गजरा
वेणी ओझावेल राणी
त्याचा सोसून डोलारा – – –!

○○

५

केस मोकळे मोकाट
गळे कोवळा अंधार
पाठमोरा देह झुले
जप, झुकेल गांधार – – –

देठ खुडलेला वारा – – –
जरा पदर हालवी
माती मोहरून आली
तुझी झेलून सावली – – –

तुझ्यासाठीच ग सखे
शब्द फूल – फूल झाले
डोहातील मासळीला
तुझे डोहाळे लागले – – – !

○○

६

उन्ह टाकताना कात
तुझी दारात सावली – –
गळा फुटताना ओवी
गाथा निथळे राऊळी

अशा कलत्या उन्हात
देह उन्हाचीच साथ
ओलांडून उंबरा ये
दृष्ट काढूंदेत माय – –

घर बांधताना माझे
तुझ्या डोळ्यांत पाहिले
आणि भाळावर तुझ्या
माझे हृदय ठेविले !

○○

७

तुझ्या पापणीत पाणी
आली चांदण्याला कळ
सुन्न सावळा अंधार
शोधी श्वासातील बळ – –

कळूं येता व्यथा तुझी
तम निखळला राणी
माझ्या आसवा–आसवा
तुझ्या वेदनांची गाणी !

○○

८

माझ्या ओळखीच्या देशा
तुझ्या पावलांची फुले
प्राण गुंतून फुलांत
झाले मरण मोकळे – !

राजन गवस
बी. ए. भाग ३

## शाप —

नियतीने ... ! .. जिने मला शाप दिला,
एकाएकीपणाच्या भयाण अंधारात
चाचपडण्याचा,
अश्रूंनाही, भयाण अंधारात गोठून
जाण्याचा,
खूप वाट पाहिली उःशापाची
वाटलं, या एकाकी आयुष्याच्या वाटेवर
कुणीतरी सोबती लाभेल,
अंधारातही दोन मनाच्या तारा जुळतील,
एक आर्त स्वर झंकारेल,
पण तिथेही नियतीने डावच साधला
या शापालाही चिरंजीवीत्वाचं
वरदान लाभलंच !

– जयश्री एकबोटे
बी. ए. भाग २

○○

## एक दिव्य —

एक दिव्य जगणे आहे.
ज्ञानासाठी कार्यासाठी,

एक मर्म जगणे आहे,
जीवासाठी स्वतःसाठी.

एक विचार करणे आहे,
जीवन संग्रहासाठी.

एकदा शेवटी मरणे आहे,
आत्मरूपी जगण्यासाठी.

- मिरजे एम् बी.
बी. ए. भाग ३

○○



## अंधाराकडं

सूर्यास्त झालाय्,
        सूर्याकडे पाठ फिरवून अंधार गाठायचा
हवासा वाटणारा ऽ ऽ क्षणभर सुख देणारा
जा ! तुला जायचंय सूर्योदयाकडे –
दिलदार आशा नि महत्वाकांक्षेची गाठोडी बांधून,
जीवनाचा मार्ग गाठायचाय् ...
नादान, नालायक हजारो विशेषणांनी,
शापलेले आमचे पुतळे कोण उद्धारणार ?
उद्धार ! छे ऽ ऽ !
तुमच्या पवित्र लाभानं केव्हा लाथाडणार ... ...
माणुसकी ही काय चीज ?
कुणी, कुणासाठी नि का बनवलीय्,
तिची गोडी चाखायचीय् .. ... नको
पापाचं ओझं माथ्यावर बांधून
अघोरी व्यथा हृदयात ठेवून,
प्रवास करायचाय् ... अंधाराचा
नाहीतर, तुम्ही सूर्याकडं बघत चला
एक दिवस तारांनी न्हाल,
आमचा अंधःकार दूर कराल,
पण तरीही या शांततेचा भंग
        कधी करायचा नाही
म्हणून चाललोय् .... .. अंधाराकडं.

**- श्रीकांत सावंत**

बी. ए. भाग ३

## लावणी हिसक्याची

आज मी हसले
भेटीत ठरले – –
डोळ्यांनी टिपल्या खुणा
सख्या, भेटशील का रे पुन्हा ? ॥ १ ॥

नयन भरोनी काजळ घालुन
चंद्रकोर कपाळी लावुन
हिरवी साडी, हिरवा चुडा
काय मी केला गुन्हा ?
सख्या भेटशील का रे पुन्हा ॥ २ ॥

बांधीयली, पायी घुंगरं
तार छेडिता, निघाले स्वर
साथ मिळाली मज रूपाची
पण कोकिळेला कंठ फुटेना ?
सख्या भेटशील का रे पुन्हा ? ॥ ३ ॥

भर ज्वानीचे, अंगी यौवन
पदर सरकतो, ऊर उंचावून
मज मीलनाची साथ हवी रे
गुंफुन ठेवु रे मना
सख्या भेटशील का रे पुन्हा ? ॥ ४ ॥

खुशीतली मज, ऊब हवी रे
याद नको, मज भेट हवी रे
मी सख्याची वाट पाहुनी
गायिली हिसक्याची लावणी
आज माझ्या प्रीतिच्या
कळल्या मला रे खुणा
सांग, भेटशील का रे पुन्हा ॥ ५ ॥

# शब्दवेध

शब्दांचे असे बाण फेकू नकोस,
घायाळ मनाचा वेध असा घेवू नकोस
बोलायचे ते अबोलपणे सांगून जा – – –
अश्रूच्या सरी ओंजळीत घेवून जा – – –
हळव्या कोमल गंधाला असे उधळू नकोस,
मनाच्या तारा अशा सैल सोडू नकोस,
शब्दांचे असे बाण फेकू नकोस
घायाळ मनाचा वेध असा घेवू नकोस.

– मिरजे एम् बी.
बी. ए. भाग ३

○○

# जखम

स्वप्नरूपी या चित्तेवर मज स्मृतीने जाळले.
भावभोळया वेदनांचे बोल मुग्धच राहिले.
मी किनारा कोरडा भिजता मला न आले.
दु:ख हृदयीं खोलरूतूनी मन्मनी ते राहिले.
मागणाऱ्या प्रीतीचे अन् शब्द नाही जाणले.
मांडुनी त्या भावनांचे डाव अर्धे राहिले.
भीतीने त्या कंटकाच्या मी फुलाला लपविले.
अन् फुलाने डंख केला हे उशीरा समजले.

– शाम मोरे
बी. कॉम. भाग ?

○●

# भोग तू माझ्या नशीबा

भंगलेल्या प्राक्तनाला आसवांचे गान झाले
अंत नाही वेदनेला, वेदनेने हाल केले – – –
जाहलेल्या त्या चुकांचा दोष का नशीबास यावा – ––
भोग तू माझ्या नशीबा, हराम्यांचे विश्व झाले – – –
बोलण्यावाचून कांही बोल तू लावून घेता
निंदकाच्या बोलण्याची मन्ममनी व्हावी फुले
सज्जनांच्या वाटेवरी दुर्जनांचे काटे उभे
भाव नाही राहिले रे ! दुष्ट बुद्धी येथ चाले – – –
वेदनांच्या या जमाती चांदणे हे हे मुखाचे
चंद्र जाता, त्या परांनी या मनाला दु:ख झाले – – – !

– जोतीबा जी. पाटील
एफ्. वाय्. बी. अे.

○○

# व्यथा

नाही अंधार किनारा
नाही साथ कुणाची
उठतात नादवलये
माझ्याच पावलांची
वायुलहरी मधून उठती
स्वर आर्त व्याकुळतेचे
भरूनी असे येती
का नेत्र तारकांचे
असेल जर ते मृगजळ
का मी मागे धावावे
हृदयातल्या कळयांचे
मधुकोष मी जपावे
असा यावा उष:काल
दिठीस दिठी मिळावी
स्वप्नांतल्या कळयांची
फुले होऊन जावी

– रावळ टी. बी.
बी. कॉम. भाग ३

○○



## सायंकाळ

धुंद अशा त्या सायंकाळी
हिरव्या गारशा कुरणावरती
उमलली होती स्वप्नफुले
त्या स्वप्नांच्या जगतामध्ये
होतो फक्त ती अन् मी ॥

तिच्या मादक ओठावरती
फुलली होती हास्यफुले
त्या हास्यांच्या मोहामधुनी
जीवन माझे जणू उमलते ॥

तिच्या कमलनेत्रावरती
दिसली होती प्रीतीमुळे
त्या प्रीतीच्या धुंदीमध्ये
कुणास कोणी वचन दिले ॥

आमुच्या अमर प्रीतीवरती
खुलली होती हास्यफुले
त्या हास्यांच्या एकांतामधी
हृदयांचा पूल झुले ॥

— शैलजा जोशी

●○

## अनामिकास ....

कोणी म्हणतील ते स्वर्गी – प्रभूकडे गेले
खरंच ! कोण होते ते वीर क्रांतीतील ?
कुणा आज स्मरेल का ?
कुणाचे प्रिय बंधू तर कुणाचे सुपुत्र,
देशाच्या स्वातंत्र्यासाठी झिजले दिनरात,
त्यांच्या स्मृतिस्तंभासमोर
दिसतील कोमल फुलांचे हार
अंतरी दाटतात दुःखाश्रूंचे निःश्वास
हिंदमातेच्या त्या आठवता वीरांस,
मायभूमीच्या कुशीत विलीन झालेले ...
रजनीच्या उदरातील चमकणारे तारे,
मातृभूमीची सेवा ज्यांनी अखंड केली,
त्यांच्या स्मृतीविना आम्ही पुढे चाललो,
तरीही प्रभू नवक्रांतिवीरांस जन्म देऊन,
क्रांतीची ज्योत सतत प्रज्वलित ठेवेल.

**— राजाराम व. पाटील**
बी. कॉम. भाग २

○○

## एकटीच एकदा ...

गीत माझे लाटेवर खेळणारे – खेळणारे
कोमल कळी कमळांची डुलणारी – डुलणारी
एकटीच एकदा
येऊन जा, पाहून जा – – –
दुःख तुझे हरपून जा रूसणारे – रूसणारे.
गीत माझे फुलावर भ्रमणारे – भ्रमणारे.
गूढ निळ्या नभांत घुमणारे – घुमणारे
एकटीच एकदा
येऊन जा, पाहून जा – – –
दुःख तुझे विसरून जा नमणारे – नमणारे,
गीत माझे वेलीवर फुलणारे – फुलणारे,
मंद प्रेम वारे येताच डुलणारे – डुलणारे
एकटीच एकदा,
येऊन जा, पाहून जा – – –
दुःख तुझे सांगून जा झुकणारे – झुकणारे

**– पन्नुरे के. डी.**
बी. ए. भाग ३

●●

# प्राध्यापक वर्ग

१) प्राचार्य बी. बी. देशमुख M.A.
२) प्रा. डॉ. ए. जी. गोकाककर M.A.,B.Ed.,Ph.D.
३) प्रा. एस. टी. जाधव M.A.
४) ,, बी. के. सोरटे M.A.
५) '' एन्. आर. दुंडगेकर M.A.,LL.B.
६) '' व्ही. एस. बन्ने M.A.
७) '' ए. ए. पोवार M.A.
८) '' व्ही. एन. गजेंद्रगड M.A.,B.Ed.
९) '' सी. एस. गवसणे M.Com.
१०) '' के. व्ही. कुराडे M.A.
११) '' सौ. एस. एम. जगताप M.A.
१२) '' '' एम. एन. कोटीभास्कर M.A.
१३) '' के. बी. केसरकर M.A.,B.Ed.
१४) ,, एन. डी खिचडी M.Com.
१५) प्रा. जी. जी. गुळवणी M.A.
१६) ,, ए. एस. नाळे B.A.,H.D.P.Ed.
१७) ,, डी. के. दंडगे B.A.,LL.B.
१८) ,, ए. एस. मुधोळे M.Sc.
१९) ,, आर. एन. हरगुडे B.Com.,LL.B.A.C.A.
२०) ,, डी. जी. उप्पार M.A.
२१) ,, व्ही. के. पाटील M.Com.D.C.M.
२२) ,, जी. एस. भोपले M.A.
२३) ,, सी. ई. धुमाळ M.A.,LL.B.T.D.
२४) ,, कु. एस. सी. फडके M.A.
२५) ,, वाय. पी. कोले M.Com.
२६) ,, आर. वाय. किंकर M.A.
२७) ,, कु. एस. एस. जोशी M.A.

# कार्यालयीन कर्मचारी वर्ग

| | |
|---|---|
| १) श्री. जे. ए. सबनीस B.A. | सुपरिटेंडेंट |
| २) ,, टी. ए. पाटील B.Sc.,M.A. B Lib.Sc. | लायब्ररीयन |
| ३) ,, व्ही. एम. गवळी | क्लार्क |
| ४) ,, बी. एस. मोहिते B.Com. | अकौंटंट |
| ५) ,, बी. डी. रेगडे | क्लार्क |
| ६) ,, वाय. डी. पाटील B.A. | ,, |
| ७) कु. पी. जी. चौथे | ,, |
| ८) श्री. एम. एच. देसाई | ,, |
| ९) ,, बी. आय. रामपूरे | मुख्य शिपाई |
| १०) ,, एस. एस. गवळी | शिपाई |
| ११) ,, पी. के. जाधव | ,, |
| १२) ,, डी. एम. मोरे | ,, |
| १३) ,, बी. एस. सावंत | ,, |
| १४) ,, ए. जी. कदम | लायब्ररी असि. |
| १५) ,, एल. जी. गाडीवड | ,, |
| १६) ,, सी. एल. गोरुले | वॉचमन |

**स्नेहसंमेलन :** सत्कार – खा. बाळासो माने व खा. उदयसिंगराव गायकवाड.

प्रमुख पाहुणे – डॉ. गो. मा. पवार













बिचारा डायरेक्टर



पूजा नृत्य



सन् अॅड सॅण्ड

# व्हरायटी



आदिवासी मुलाखत





# नाटक - "घेतलं शिंगावर"








## प्राध्यापक वर्ग



## कर्मचारी वर्ग



## वर्गप्रतिनिधी



*With best compliments from*

**RAMSON BROS.**

Sports Dealers

Shivaji Road, Kolhapur,

हाय्यर सेंकडरी व शिवाजी विद्यापीठ

★ सर्व वर्गांची,

★ कोणत्याही लेखकांची,

★ इंग्रजी – मराठी माध्यमातील,

पुस्तके. गाईडस्, संभाव्य प्रश्नोत्तरे

त से च

सिलॅबस, पेपरसेटस् रजि. फॉर्म्स इ. सर्व

मिळण्याचे शहरातील विद्यार्थीप्रिय ठिकाण

**❋ अजब पुस्तकालय, कोल्हापूर-२ ❋**

○ भाऊसिंगजी रोड ○ फोन. नं. ६७१०

With Best Compliments from

## Dr. Mane Hospital

Maternity & Nursing Home
Shivaji Road, Gadhinglaj.
Dist. Kolhapur

Visiting Eye Specialist

**Dr. Preetam Shah**

on every second Sunday

शेतकऱ्यांची बँक

**कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.**
**कोल्हापूर**

केंद्र कार्यालय, शाहूपुरी, कोल्हापूर.

मुलांचे शिक्षण, मुलींची लग्ने, लहान मोठ्या उद्योगाची उभारणी, स्वतःचे छोटेसे घरकूल या सारखी अनेक स्वप्ने आणि संकल्प यानेच जीवनाची समृद्धी होत असते, तुमच्या छोट्यामोठ्या स्वप्नांच्या आणि संकल्पांच्या पूर्ततेसाठी आम्ही वगवेगळ्या ठेवींच्या द्वारा मोलाची मदत करु. भरपूर व्याज देणाऱ्या अनेक ठेव योजना तुमच्या मदतीस तयार आहेत.

- विविध ठेव योजनेसाठी बँकेच्या
- नजीकच्या शाखेस भेट द्या.

**आर. एस. देसाई** — व्हा. चेअरमन
**पी. बी पाटील** — चेअरमन
**ए. व्ही. निकम** — मॅनेजर

शिवराजला हार्दिक शुभेच्छा !

**पुस्तकासाठी**
कोल्हापुरातील दोन दुकाने ! !

## • फडके बुकसेलर्स •

महाद्वार रोड,
कोल्हापूर ४१६ ००२
फोन नं. ५८७५

## ★ फडके बुक सेंटर ★

बिनखांबी गणेश मंदिर चौक,
महाद्वार रोड,
कोल्हापूर ४१६ ००२

गडहिंग्लज परिसरातील सर्व प्रकारच्या पोह्यांचे अग्रेसर उत्पादक

## ★ प्रकाश पोहे फॅक्टरी ★

गडहिंग्लज (जि. कोल्हापूर)
फोन : ऑफीस ७६ फॅक्टरी १८४

## ※ रमेश स्वीट मार्ट ※

**टिळक रोड, गडहिंग्लज.**

आमचेकडे पेढे, बर्फी, कुंदा, करदंट, खवा व इतर स्वीटस् व मस्त फरसाण मिळण्याचे एकमेव ठिकाण–

प्रोप्रा. भिमराव कृष्णा मोरे

# हिन्दी विभाग



ताक रहे हो गगन ?
मृत्यु – नीलिमा – गहन गगन ?
अनिमेष, अचितवन, काल – नयन –
निःस्पंद, शून्य, निर्जन, निःस्वन !

– श्री. सुमित्रा नन्दन पंत

# अनोखा रिश्ता

– जयश्री पां. खोत
बी. ए. भाग २

रूपेश और शैलेश दो भाई थे, जिन में रूपेश बडा था। रूपेश एक साधारण लड़का था। इस के विपरीत शैलेश असाधारण स्वभाव का लडका था। इन दोनों की कोई बहन न थी। वैसे तो दोनों भाई चाहते थे कि उन की कम से कम एक बहन होनी चाहिए, परंतु रूपेश के मनमें यह इच्छा कभी कभी वर्षा ऋतु की बिजली के समान एक क्षण के लिए दौड जाती थी। परंतु शैलेश के मन में यही इच्छा आकाश में हरदम चमकनेवाले सूरज के समान चमकती रहती थी। उस की हार्दिक ख्वाहिश थी कि अपने और किसी एक पराए घर की शान में चार चाँद लगाने के लिए उन की एक बहन तो जरूर होनी ही चाहिए। लोग उन के परिवार में बेटी न होने के कारण बहुत भाग्य-शाली समझते थे, अपितु शैलेश इस सौभाग्य को दुर्भाग्य मानता था।

आखिर एक दिन आया जब शैलेश का सपना यथार्थ बदल गया। उस की माँ ने एक लडकी को जन्म दिया। शैलेश की खुशी का ठिकाना न रहा। इस समय उसकी उम्र लगभग तेरह साल की थी। वह आठवी कक्षा का विद्यार्थी था। इतनी उम्र में ही उसके मन में डॉक्टर बनने की अभिलाषा थी। वह अभी ये सोचने लगा था कि अपनी बहन को भी डॉक्टर बनाऊँगा। अपने माता-पिता से हमेशा कहता था कि उसे मैं खुद पढाऊँगा। मुन्नी भी शैलेश के पास इतनी खुशी से आती थी, जैसे कि वह जानती हो कि उस के आने से शैलेश को सब से अधिक प्रसन्नता हुई है। अब वह एक साल की हो गई। शैलेश के बिना एक घडी भी रहना उसके लिए असंभव था। परंतु दुर्भाग्यवश: वह इस समय सख्त बीमार पडी और इसी बीमारी में उसने बडेसे बडे डॉक्टरो के प्रयत्न के बावजूद भी प्राण त्याग दिए। शैलेश के लिए वह मृगतृष्णा सी रह गई।

इस घटना के बाद शैलेश की स्थिती पागलों की सी हो गई उस का मन किसी चीज में भी न लगता। घर में माता – पिता को मुन्नी के बिछुडने से इतना दुख न हुआ था जितना अब उन को शैलेश की स्थिती देखकर होने लगा। अब भी उस के मन में डॉक्टर बनने की बहुत उमंग थी, परन्तु मुन्नी की मृत्यु के बाद उस को ऐसा धक्का लगा कि वह फिर कभी परिक्षाओं में सिर्फ उत्तीर्ण होने के अलावा कुछ ज्यादा गुण न ले सका। अब वह जब भी किसी लडकी को देखता तो उसे बहन के रूप में देखता। जब वह एस्. एस्. एल्- सी. की परीक्षा दे चुका था, उसका परिचय एक लडकी से हुआ इस लड़की को देखकर मुन्नी की याद उस के मन में ताजी हो गई। लडकी का नाम था कान्ता। कान्ता शैलेश की दूर से बहन लगती थी। कान्ता का नाना शैलेश की नाना का भाई था। कान्ता के माता-

पिता उस के बचपन में ही गुज़र गये थे। उस की सिर्फ एक बहन थी जो उसके लगभग पन्द्रह साल बड़ी थी। जब से कान्ता के माता – पिता इस दुनिया से चल बसे थे उसे उस की दीदी तथा उस के जीजाजी ने पाला था। उस की दीदी बेहद प्यार करती थी। कान्ता को कभी ऐसा लगने नहीं देती वह मातृहीन है। परन्तु कान्ता को भ्रातृहीन होने का बहुत दुख था। कान्ता शैलेश से कुछ तीन – चार बरस बड़ी थी। एक दिन शैलेश ने कान्ता को अपने दिल का दुख ऐसा सरलता से बता दिया जैसे की कान्ता उसकी हो। कान्ता को यह सुनकर शैलेश पर दया आ गई। उस दिन से उन दोनों के बीच भाई–बहन का संबंध उत्पन्न हुआ और बढ़ने लगा। कान्ता को खुश रखना ही उस के जीवन का उद्देश्य बन गया। शैलेश उस की बात कभी नहीं टालता था। वैसे तो कान्ता को बदसूरत नहीं कह सकते परन्तु वह देखने में कोई अप्सरा भी नहीं थी। कान्ता के दिल में देश–प्रेम की भावना बहुत थी।

शैलेश अब पी. यु. सी. का विद्यार्थी था। कॉलिज में एन्. सी. सी. अनिवार्य थी। कान्ता की प्रेरणा से ही शैलेश के मन में एन्. सी. सी. के लिए आसक्ति पैदा हुई। कुछ समय के बाद शैलेश को एन्. सी. सी में अन्डर आफीसर की रैंक भी मिल गयी। अब रूपेश एक साइन्स कॉलिज में प्रोफेसर था। पी. यु. सी. की परिक्षा में काफी अच्छे गुण लेने के बावजूद भी शैलेश मेडिकल कॉलिज में जगह न पा सका। इससे वह निराश तो हुआ परन्तु उसने निश्चय किया की वह बी. एस्. सी. के बाद फिर एक बार मेडि–कल कॉलिज में दाखिल होने की कोशिश करेगा। परन्तु कान्ता ने उसे ऐसा करने से मना किया और कहा कि उस के सेना में जाने से उसे बहुत खुशी होगी। शैलेश ने कान्ता का दिल रखने के लिए उस की बात मान ली। ओ. टी. यु. की परीक्षा में बैठा और सफल रहा। बी. एस्. सी. होते ही उसे कप्तान की ओहदे की नौकरी मिली और इस के बाद दिल्ली में रहने लगा। शैलेश की हमेशा यही इच्छा रही कि कान्ता एक दिन उसकी भाभी बने परन्तु यह इच्छा उसने अपने दिल ही में रखी और किसी के सामने प्रगट नहीं की।

दिल्ली में शैलेश को कान्ता की याद बहुत सताती थी। जब भी ऐसा होता वह कान्ता को एक खत लिख डालता। यहीं शैलेश का परिचय प्रकाश से हुआ और दोनों में गहरी मित्रता उत्पन्न हो गयी। शैलेश ने एक बार कान्ता को एक पत्र लिखा जिस में उसने प्रकाश के बारे में वर्णन किया। साथ ही उसने लिखा "– मैंने उसे तुम्हारे बारे में कहा था और उसने तुमसे मिलने की बड़ी इच्छा प्रकट की थी। खैर अब हम दोनों कुछ ही दिनों में हुबली आ रहे है। आखिर यह दिन आ गया जब प्रकाश और शैलेश आनेवाले थे। कान्ता और रूपेश उनका स्वागत करने के लिए बेलगाँव हवाई – अड्डे पर गये। जब शैलेश, प्रकाश के साथ जहाज से उतरा तो उस की आँखें एकदम साथ – साथ खड़े रूपेश कान्तापर पड़ी। एक क्षण के लिए उसे लगा कि कान्ता को भाभी के रूप में देखने का सपना आज ही पुरा हो गया है। शैलेश ने प्रकाश को अपने भाई–बहन से परिचय कराया। कान्ता को देखते ही प्रकाश सबकुछ भूल गया और उसे ही देखता रहा। कान्ता की आँखें भी उस के वश में न रही। घड़ी घड़ी प्रकाश पर जा टिकती।

शैलेश और प्रकाश हुबली में सिर्फ पन्द्रह दिन रहे, परन्तु इन पन्द्रह दिनों में बहुत कुछ हुआ। प्रकाश और कान्ता में ऐसा प्रेम हो गया जैसे कि वे दोनों एक – दुसरे को बचपन से जानते हो। प्रकाशने शैलेश से कह भी दिया कि वह कान्ता से शादी करेगा, परन्तु पहले अपने माता – पिता की अनुमती लेगा। शैलेश को इस बात से अत्यन्त प्रसन्नता हुई क्यों कि वह अब तक जान चुका था रूपेश कान्ता को अपनाने के लिए इतना उत्सुक नहीं है जितना कि वह खुद कान्ता को भाभी बनाने के लिए उत्सुक है। जिस दिन शैलेश और प्रकाश रवाना हुए उस दिन कान्ता, रूपेश और उसके माता–पिता का पक्का खयाल था कि कुछ ही

